सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
वर्ष - ३ रे अंक - २२७ वा अमरावती (महाराष्ट्र) गुरुवार दि. ९ आक्टोंबर २०२५ संपादक - डॉ. शुभांगी जोशी मुल्य - १ रु. पृष्ठ -६

## ब्रिटनची ९ विद्यापीठे भारतात कॅम्पस उघडणार

### भारतीय हवाईदलाचे ट्रेनर रॉयल एअर फोर्सला ट्रेनिंग देणार; मिनरल्स क्षेत्रातही सहकार्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मुंबई**

ब्रिटनची ९ विद्यापीठे भारतात आपला कॅम्पस सुरू करतील. ब्रिटिश पंतप्रधान केयर स्टार्मर यांनी मुंबईत ही घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावेळी स्टार्मर यांच्या नेतृत्वात भारत-ब्रिटन संबंधांत मोठी प्रगती झाल्याचे स्पष्ट केले.

मोदींच्या गत जुलै महिन्यातील लंडन दौऱ्यात दोन्ही देशांनी व्यापक आर्थिक आणि व्यापार करारावर (उएढ-) स्वाक्षरी केली होती. मोदींनी सांगितले की, या करारामुळे दोन्ही देशांमधील आयात सुलभ होईल, व्यापार वाढेल आणि तरुणांना रोजगार मिळेल.

दोन्ही नेत्यांनी इंडो-पॅसिफिक, पश्चिम आशिया आणि युक्रेन संघर्षावरही चर्चा केली. संरक्षण सहकार्याच्या क्षेत्रात, भारत आणि ब्रिटनने लष्करी प्रशिक्षण करारावर स्वाक्षरी केली आहे, ज्या



अंतर्गत भारतीय हवाई दलाचे उड्डाण प्रशिक्षक आता ब्रिटिश रॉयल एअर फोर्समध्ये प्रशिक्षक म्हणून काम करतील.याव्यतिरिक्त, दोन्ही देशांनी क्रिटिकल मिनरल्स (महत्त्वपूर्ण खनिज) सहकार्य करण्यासाठी इंडस्ट्री गिल्ड अँड सप्लाय चेन ऑब्झर्व्हेटरी ची स्थापना करण्याची घोषणा केली. त्याचा एक उपग्रह कॅम्पस झारखंडमधील धनबाद येथील इंडियन स्कूल ऑफ माइन्समध्ये असेल.मोदी म्हणाले की, उएढ-करारामुळे तरुणांसाठी नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतील, व्यापार वाढेल आणि आपल्या उद्योगांना तसेच ग्राहकांना फायदा होईल.मोदी म्हणाले की, भारत आणि ब्रिटन हे नैसर्गिक भागीदार आहेत. आपल्या संबंधांचा पाया लोकशाही, स्वातंत्र्य आणि कायद्याचे राज्य यासारख्या सामायिक मूल्यांमध्ये रुजलेला आहे. जागतिक अस्थिरतेच्या या काळात, भारत आणि ब्रिटनमधील ही वाढती भागीदारी जागतिक स्थिरता आणि आर्थिक प्रगतीसाठी एक महत्त्वाचा पाया ठरली आहे.ब्रिटीश पंतप्रधान स्टार्मर म्हणाले, गत जुलै महिन्यात पंतप्रधान मोदींचे युकेमध्ये स्वागत करणे हा मोठा सन्मान होता. त्यानंतर काही महिन्यांतच भारताला भेट देऊन मला खूप आनंद होत आहे.

## वीज कर्मचाऱ्यांच्या संपानंतर आता एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन १३ ऑक्टोबरपासून

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

विद्युत क्षेत्रातील खासगीकरणाविरोधात राज्यातील महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपनीतील अधिकारी- कर्मचारी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अभियंता अधिकारी कृती समितीच्या नेतृत्वात बुधवारी मध्यरात्रीपासून संपावर गेले आहे. त्यामुळे वीज यंत्रणा सलाईनवर असतांनाच महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीकडून एसटी कर्मा्यांच्या विविध मागणीसाठी १३ ऑक्टोबरपासून आंदोलनाची घोषणा केली गेली आहे. हे आंदोलन कसे राहणार? त्याबाबत आपण जाणून घेऊ या.



महाराष्ट्र एसटी कामगार संयुक्त कृती समितीच्या माहितीनुसार, एसटी कामगारांच्या न्याय मागणीसाठी १३ ऑक्टोबर २०२५ पासून मध्यवर्ती कार्यालय मुंबई येथे रा. प. कामगारांच्या प्रलंबित आर्थिक प्रश्नांच्या सोडवणुकीकारिता धरणे आंदोलन सुरू केले जाईल. त्यानंतरही एसटी कामगारांच्या प्रलंबित आर्थिक मागण्यांची सोडवणूक न झाल्यास १४ ऑक्टोबरपासूनअमरावती विभागातील संयुक्त कृती समिती विभागीय कार्यालय, विभागीय कार्यशाळा व सर्व आगारात बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले जाईल. टप्पा टप्पाने हे आंदोलन राज्यभरात होणार आहे.

एसटी कामगारांच्या विविध मागण्यांवर शासनाने अनेक आश्वासने दिली. परंतु एकही पूर्ण केले जात नाही. त्यामुळे नाईलाजाने हे आंदोलन करावे लागत आहे. शासनाने एसटी कामगारांना न्याय न दिल्यास तिव्र आंदोलन करण्याशिवाय पर्याय राहणार नाही. आता एसटी कामगारांवर अन्याय सहन केला जाणार नसल्याचे हि महाराष्ट्र एस टी कामगार संघटनेचे विभागीय सचिव मोहित देशमुख यांनी सांगितले.

## विदर्भातील औद्योगिक वसाहतींमध्ये तब्बल एक हजार २४६ युनिट बंद; हायकोर्टाकडून गंभीर दखल

### अमरावती विभागात ४१७ युनिट बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

विदर्भातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक वसाहतींमध्ये तब्बल एक हजार २४६ युनिट बंद आहेत. तसेच, भूखंड वाटप झाल्यानंतरही तीन हजार ९०६ युनिट अद्याप सुरू करण्यात आले नाहीत. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने बुधवारी ही बाब गंभीरतेने घेऊन यासंदर्भात स्वतःच जनहित याचिका दाखल केली.

नागपूर विभागामध्ये ५२ आणि अमरावती विभागात ४६ औद्योगिक वसाहती आहेत. नागपूर विभागातील एकूण ८ हजार ९८१ पैकी ७ हजार ५०६ भूखंडांचे वाटप झाले आहे. वाटप झालेल्या भूखंडांवर सध्या ४ हजार २१९ युनिट कार्यरत असून, ८२९ युनिट बंद आहेत. अमरावती विभागातील एकूण ७ हजार १८५ पैकी ६ हजार ५२५ भूखंडांचे वाटप झाले आहे. वाटप झालेल्या भूखंडांवर सध्या २ हजार ५२६ युनिट कार्यरत असून ४१७ युनिट बंद आहेत. याशिवाय, विदर्भातील १० सहकारी औद्योगिक वसाहतींमध्ये एकूण २ हजार ३२७ भूखंड आहेत. त्यातील २ हजार २४८ भूखंडांचे वाटप झाले असून, त्यावर १ हजार ५९३ युनिट कार्यरत आहेत. तर १२० युनिट बंद पडले आहेत.



#### अशी आहे जिल्हानिहाय परिस्थिती

| जिल्हा | भूखंड | वाटप भूखंड | कार्यरत युनिट | बंद युनिट |
|---|---|---|---|---|
| नागपूर | ६,१८९ | ५,१७७ | ३,२६० | ५११ |
| भंडारा | १५५ | १३३ | ७७ | २२ |
| गोंदिया | ४२१ | ३३१ | १४४ | ५२ |
| चंद्रपूर | १,१३० | ८१९ | ३४७ | ८५ |
| गडचिरोली | २३८ | २०२ | ४५ | ३६ |
| वर्धा | ८४८ | ७६४ | ३४६ | १२३ |
| अमरावती | १,९९६ | १,९०९ | ५१५ | ७३ |
| अकोला | २,६०८ | २,३१२ | १,२१० | ९३ |
| बुलढाणा | १,०४६ | ९३७ | ४५० | १३५ |
| वाशिम | ३०६ | २०८ | ३२ | ११ |
| यवतमाळ | १,२२९ | १,१५९ | ३१९ | ४१७ |
| एकूण | १६,१६६ | १४,०३१ | ६,७४५१ | १,२४६ |


या प्रकरणावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. त्यानंतर न्यायालयाने या प्रकरणाचे कामकाज पाहण्यासाठी ॲड. संकेत चरपे यांची न्यायालय मित्र म्हणून नियुक्ती केली. तसेच, त्यांना नियमानुसार जनहित याचिका तयार करण्याचे निर्देश दिले.

## दीक्षाभूमीचा विकास झालाच पाहिजे, कामांची माहिती द्या ! हायकोर्टाने दिले आदेश

### अनुयायांच्या सुविधेवर भर दिला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**

मुंबई उच्च न्यायालयाच्यानागपूर खंडपीठाने बुधवारी आंतरराष्ट्रीय श्रद्धास्थळ दीक्षाभूमीच्या सर्वांगीण विकासाकरिता पुढील कार्यवाहीची दिशा स्पष्ट केली. अनुयायांच्या सुविधेकरिता दीक्षाभूमीचा सर्वांगीण विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे वर्तमान परिस्थितीत कोणकोणती विकासकामे करणे शक्य आहे याची माहिती रेकॉर्डवर सादर करण्यात यावी. त्यानंतर आम्ही आवश्यक आदेश जारी करू, असे न्यायालय जनहित याचिकाकर्ते ॲड. शैलेश नारनवरे यांना म्हणाले.



ॲड. नारनवरे यांनी दीक्षाभूमीच्या सर्वांगीण विकासाकरिता २०१८ मध्ये जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तिद्वय अनिल किलोर व रजनीश व्यास यांच्यासमक्ष सुनावणी झाली. या प्रकरणात न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या आवश्यक आदेशांमुळे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणने दीक्षाभूमी विकास आराखडा तयार केला आहे.

या आराखड्यावर तीन टप्प्यांमध्ये अंमलबजावणी केली जाणार असून राज्य सरकारने पहिल्या टप्प्यासाठी २०० कोटी रुपये निधी वाटप केला आहे; परंतु दीक्षाभूमीच्या जमिनीवर अंडरग्राउंड पार्किंग बांधण्यास जोरदार विरोध झाल्यामुळे महानगर प्राधिकरण विकास आराखड्यात बदल करणार आहे. ही प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याने दीक्षाभूमी विकासाची कामे गेल्या वर्षभरापासून रखडली आहेत.

न्यायालयाने ही बाब लक्षात घेता पुढील कार्यवाहीची दिशा स्पष्ट केली. त्यानुसार, ॲड. नारनवरे यांना अंडरग्राउंड पार्किंग वगळता इतर कोणकोणती विकासकामे करणे शक्य आहे, याची माहिती न्यायालयाला द्यायची आहे. त्याकरिता महानगर प्राधिकरणने ॲड. नारनवरे यांना विकास आराखड्यातील कामांची संपूर्ण माहिती द्यावी, असे न्यायालयाने सांगितले आहे.

## सरन्यायाधीश गवईंवर हल्ला करणाऱ्या वकिलावर अखेर गुन्हा दाखल, आता पोलीस कधीही....

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नवी दिल्ली**

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी घडलेल्या अभूतपूर्व प्रकारात एका वकिलाने वस्तू (चप्पल किंवा कागदाचा गुंडाळा) फेकण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर न्यायालयीन कामकाज काही मिनिटे थांबले, मात्र सरन्यायाधीशांनी अत्यंत संयम राखत सुनावणी पुन्हा सुरू केली. हल्ला करणारा वकील राकेश किशोर (वय ७१) हा खजुराहोतील भग्नावस्थेतील भगवान विष्णू मंदिराच्या पुनर्स्थापनेसाठी




दाखल याचिका फेटाळल्याबद्दल असंतुष्ट होता, अशी माहिती नंतर समोर आली.

पोलीस अधिकाऱ्यांच्या हवाल्याने मिळालेल्या माहितीनुसार, राकेश किशोर हे सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे नोंदणीकृत सदस्य आहेत आणि ते दिल्लीच्या मयूर विहार परिसरात राहतात. त्यांनी २००९ मध्ये दिल्ली बार कौन्सिलमध्ये नोंदणी केली होती. ज्येष्ठ वकील असलेले राकेश किशोर हे अनेक वर्षांपासून विविध बार असोसिएशन्सचे सदस्य राहिले आहेत. पोलिसांना राकेश किशोर यांच्याकडे सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन, शाहदरा बार असोसिएशन आणि दिल्ली बार कौन्सिलचे सदस्यत्व कार्ड असल्याचे आढळले होते. आता राकेश किशोर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्लेखनीय आहे की सरन्यायाधीश गवई यांनी याप्रकरणी स्वतः कोणताही गुन्हा दाखल करण्यास नकार दिला होता.

बेंगळुरू पोलिसांनी सर्वोच्च न्यायालयात सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर चप्पल फेकण्याचा प्रयत्न करणाऱ्या वकील राकेश किशोर यांच्या विरोधात गुन्हा नोंदवला आहे. हा गुन्हा बेंगळुरू शहरातील विधानसौध पोलीस ठाण्यात झिरो एफआयआर म्हणून नोंदवण्यात आला आहे. 'झिरो एफआयआर' म्हणजे गुन्हा ज्या ठिकाणी घडला त्या क्षेत्रातील अधिकारक्षेत्रात पुढे पाठविण्यासाठी प्रारंभिक स्वरूपात नोंदवलेली तक्रार.

## 'उर्ध्व वर्धा'तून रब्बी सिंचनासाठी पाच पाणीपाळ्या प्रस्तावित : शेतकऱ्यांना अर्ज करण्याचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९ अमरावती**

उर्ध्व वर्धा प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध असून पाच पाणी पाळ्या देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवांनी १० नोव्हेंबरपूर्वी संबंधित शाखा कार्यालयास अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उजवा मुख्य कालव्याच्या आरंभापासून १४.३४ किमीपर्यंत व डावा मुख्य कालव्याच्या २२.४४ किमीपर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरिका, जलाशयावरील अधिसूचित नदीनाल्यांवरील लाभधारकांना रब्बी हंगामासाठी पाणी देण्यात येईल. वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जाऊ शकते तिथपर्यंत कालवा संचलन कार्यक्रमानुसार 'पुच्छ भागाकडून ते मुखाकडे' (टेल टु हेड) या तत्त्वानुसार सिंचन होणे आवश्यक आहे.

**नोव्हेंबर ते मार्च दरम्यान पाच वेळा पाणी मिळेल**

कालव्याचे प्रवाही किंवा कालव्यावरील, नदी-नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी मागणी अर्ज नमुना क्र. ७अ, ७ब कोरे फॉर्म संबंधित शाखा कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. ते भरून १० नोव्हेंबरपर्यंत तिथेच सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे. रब्बी हंगामात नोव्हेंबर २०२५ अखेरपर्यंत या कालावधीत मागणीप्रमाणे पाच पाणी पाळया देण्यात येतील.

**लाभधारकांनी नियम पाळणे आवश्यक**

इच्छुक लाभधारकांनी त्यांच्याकडील थकबाकीची एक तृतीयांश व चालू हंगामाची अग्रिम पाणीपट्टी भरावी. उपसा सिंचन लाभधारकांनी नळमार्गावर पाणी मोजमाप यंत्र बसवावे. पिकांचे मागणी क्षेत्र २० आर या पटीत असावे. पाणी अर्ज मंजूर करुन घेऊनच उपसा सिंचनासाठी पाणी वापर करावा. मंजूर क्षेत्रासाठी कालव्याचे पाणी घेण्यात येणारी शेतचारी व विहिरीवरील शेतचारी यात तीन मीटरचे अंतर असावे. पाटबंधारे अधिनियमानुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या ५० टक्के दर लागू असेल.पाणीपट्टी न भरणा-या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही. व त्यांचा पाणीपुरवठा केव्हाही बंद करण्यात येईल व थकबाकीवर शासन निर्णय नियमानुसार द.सा.द.शे. १० टक्के दरान विलंब आकारण्यात येईल.

**शेतचारा स्वच्छ ठेवा**

कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी लाभधारकांची आहे. शेतचारी स्वच्छतेअभावी पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय आल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. उडाफ्याचे क्षेत्रास पाणीपुरवठा करण्यात येणार नाही व तसेच लाभधारकांनी मंजूर क्षेत्राचे मर्यादेपर्यंत कालवा व नदी-नाल्याच्या पाण्याचा वापर करावा. मंजूरीपेक्षा जादा क्षेत्र भिजविल्यास व अनधिकृतपणे पाणी घेतल्यास नियमाप्रमाणे पंचनामा करुन दंडनीय आकारणी करण्यात येईल. मंजूर न केलेल्या क्षेत्रास पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही. लाभधारकाने दिवस व रात्री पाणी घेणे बंधनकारक आहे. अडचणी असल्यास कोणत्याही प्रकारची आगाऊ सूचना न देता पाणी पाळी पत्रकात बदल करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना राहतील.थकबाकीदार लाभधारक व थकबाकीदार पाणीवापर संस्थांना पाणी देणे बंधनकारक राहणार नाही. वितरिका पाणी पाळीमध्ये पाणी चालू असताना लाभधारक वितरिकेचा दरवाजा वेळी-अवेळी कमी-जास्त प्रमाणात उघडतात. त्यामुळे त्या वितरिकेवरील चालू असलेल्या पाण्याचा विसर्ग कमी जास्त होऊन 'टेल टू हेड' सिंचनावर विपरीत परिणाम होतो व त्यामुळे त्या वितरिकावरील पिकांना संचलनाप्रमाणे पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे प्रस्तावित पाणी पाळी कालावधीत वाढ होते.

**रब्बी हंगाम २०२५-२६ संभाव्य पाणी पाळी नियोजन**

कालव्यात पाणी सोडण्याचा कालावधी दि. १५ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर २०२५ (२२ दिवस) तर कालवा बंद कालावधी ६ डिसेंबर ते १२ डिसेंबर २०२६ राहील. दि. १३ डिसेंबर २०२५ ते ३ जानेवारी २०२६ कालव्यात (२२ दिवस) पाणी सोडण्यात येईल तर दि. ४ ते १० जानेवारी २०२६ कालवा बंद राहील. दि. ११ ते दि. २७ जानेवारी २०२६ (१७ दिवस) पाणी सोडण्यात येईल तर दि. २८ जानेवारी ते ३ फेब्रुवारी २०२६ कालवा बंद राहील. दि. ४ ते दि. २० फेब्रुवारी २०२६ (१७ दिवस) पाणी सोडण्यात येईल तर दि. २१ ते दि. २७ फेब्रुवारी २०२६ कालवा बंद राहील. दि. २८ जानेवारी ते १५ मार्च २०२६ (१६ दिवस) पाणी सोडण्यात येईल. तर नंतर कालवा पुर्णतः बंद राहील. कालव्यात एकूण ९४ दिवस पाणी सोडण्यात येईल.जर लाभधारकांनी संचलन कार्यक्रमाप्रमाणे टेल टू हेड रात्रंदिवस शेजपाळीपध्दतीने पिकांना पाणी घेतले तर संभाव्य पाणीपाळीचा कालावधी कमी होवून पाण्याचा अधिकाधिक लाभ होईल. संपूर्ण प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात शेतकऱ्यांनी कोठेही दारे स्वतः उघडून टेल टू हेड सिंचन प्रकारात अडथळा आणल्यास पाण्याचा नाश तर होतोच शिवाय पाणीपाळी कालावधी वाढतो. उर्ध्व वर्धा प्रकल्पांतर्गत असलेल्या लाभधारकांनी या बाबत योग्य ते सहकार्य करावे, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागामार्फत करण्यात आले आहे.

## संपादकीय ......

# लोकानुनयीमुळे वित्तीय शिस्तीची 'वाट'!

बिहारचा वार्षिक महसूल सुमारे ५६ हजार, कोटी आहे. त्यामुळे हा प्रश्न अपरिहार्यपणे पुढे येतो की, अशा लोकानुनयी आश्वासनांचा भार राज्याच्या अर्थव्यवस्थेवर कोसळणार नाही का? की सामाजिक न्याय आणि कल्याणाच्या दिशेने अशी आश्वासने आवश्यक आहेत? बिहारमध्ये २०२५ ची निवडणूक म्हणजे एनडीए आणि महागठबंधन (राजद+काँग्रेस) यांच्यात काट्याची लढत ठरणार आहे. या स्पर्धेत नितीश सरकारने महिलांवर आणि तरुण मतदारांवर (जे एकत्रितपणे जवळपास ६० टक्के मतदार आहेत) लक्ष केंद्रित केले आहे. १८ सप्टेंबर रोजी सुरू झालेल्या १० हजार १ सहाय्यता योजनेचा लाभ सुमारे १२ लाख तरुणांना मिळणार आहे. त्याचबरोबर १.६७ कोटी कुटुंबांना मोफत वीज आणि महिलांना ३३ टक्के आरक्षणाचे आश्वासन दिले आहे. दुसरीकडे राजदने जातनिहाय सर्वेक्षणावर आधारित आणखी व्यापक कल्याणकारी योजनांची घोषणा केली आहे. म्हणजेच बिहारमध्ये राजकीय संघर्ष आता धोरणांच्या स्पर्धेपेक्षा आश्वासनांच्या स्पर्धेत रूपांतरित झाला आहे.

लोकानुनयी योजनांनी अल्पकालीन काळात मतदारांना आकर्षित करण्यात नक्कीच मदत होऊ शकते; परंतु दीर्घकालीन दृष्टीने पाहता या घोषणांनी अर्थव्यवस्थेतील उत्पादनक्षम क्षेत्रांवर ताण येतो आणि आर्थिक स्वावलंबनाऐवजी अवलंबित्व वाढवते, असे काही अर्थतज्ज्ञही सांगताहेत. मोफत वीज आणि रोख साहाय्यता यामुळे कामगार शक्तीचा सहभाग घटतो, तर सरकारी तिजोरीवर ओझे वाढते. सध्या बिहारची आर्थिक स्थिती आधीच कमकुवत आहे. राज्याचे प्रतिव्यक्ती उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा सुमारे ४० टक्के कमी आहे. बेरोजगारीचा दर ७.२ टक्क्यांवर आहे. अशा परिस्थितीत या योजनांमुळे राज्याच्या अर्थसंतुलनावर सुरुवातीला किमान २ हजार ८०० कोटींचा अतिरिक्त ताण पडणार आहे. या योजना कायमस्वरूपी झाल्या, तर सध्या ३६ टक्क्यांवर असणारे डेट टू जीएसडीपी गुणोत्तर आणखी वाढेल.

मोफत वीज देण्याच्या योजनांमुळे राज्यातील विद्युत मंडळांवर जबरदस्त दबाव येणार आहे. आधीच तोटा झेलणार्या मंडळांसाठी हा अधिक आर्थिक भार ठरेल. मोफत विजेमुळे पाण्याचा आणि ऊर्जेचा दुरुपयोग वाढतो, तर कृषी क्षेत्रातील उत्पादन क्षमता कमी होते. बिहारची ७० टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. अशा राज्यात संसाधनांचा असमतोल वापर दीर्घकालीन विकासासाठी गंभीर अडथळा ठरू शकतो. रस्ते, शिक्षण, आरोग्य आणि उद्योग क्षेत्रांसाठी निधीची कमतरता असताना, जर मोठ्या प्रमाणावर रक्कम मोफत योजनांमध्ये ओतली गेली, तर विकासाचे मूळ स्वरूपच मागे पडेल.

बिहारमधील निवडणूकपूर्व रेवडी राजकारण हे एकाच वेळी सामाजिक कल्याण आणि आर्थिक धोका दोन्हीचे उदाहरण आहे. एकीकडे या योजनांमुळे समाजातील दुर्बल घटकांना काहीसा दिलासा मिळतो, तर दुसरीकडे त्या राज्याच्या दीर्घकालीन विकासाला मागे ढकलतात. जबाबदार राजकारण, पारदर्शक धोरणनिर्मिती आणि सजग मतदार ही आजच्या लोकशाहीची गरज आहे. कारण, शेवटी कोणतीही अर्थव्यवस्था मोफत सुविधांवर नव्हे, तर उत्पादन, परिश्रम आणि टिकाऊ विकासावर उभी राहते. रेवड्यांनी राजकीय पक्षांना मतं मिळतील; पण विकासाची किंमत मात्र भावी पिढ्यांना मोजावी लागू शकते. आता आगामी विधानसभा निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी सर्वच पक्ष कोणत्या प्रकारचा जाहीरनामा जाहीर करतात, हे लवकरच कळेल.

# तूर पिकावर अळीचा हल्ला? शेतकऱ्यांसाठी तातडीचे उपाय

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक** : तूर हे हंगामातील महत्त्वाचे आणि नफ्याचे पीक आहे, पण या पिकावर शेंगा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव झाल्यास मोठे नुकसान होते.

अळी फुलोऱ्यापासून शेंगांपर्यंत पिकाचे नुकसान करते आणि उत्पादन २५ ते ७० टक्क्यांनी घटवते. अशा परिस्थितीत वेळेवर निरीक्षण, जैविक उपाययोजना आणि एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब केल्यास तूर पिकाचे संरक्षण शक्य आहे.

ही किड तूर, कापूस, सोयाबीन, भेंडी, टोमॅटो, हरभरा यांसह जवळपास २०० पिकांवर प्रादुर्भाव करते.

**किडीचा जीवनक्रम व नुकसान–** अंडी अवस्थेतून बाहेर आलेल्या लहान अळ्या तुरीची कोवळी पाने खातात.

फुलोऱ्याच्या अवस्थेत त्या कळ्यांवर उपजीविका करतात.

शेंगा लागल्यानंतर या अळ्या शेंगांना छिद्र पाडतात आणि आतील दाणे पोखरून खातात.

एका अळीने ३० ते ४० शेंगा नुकसानग्रस्त करू शकतात.

ढगाळ हवामानात या किडीचा प्रादुर्भाव वेगाने वाढतो आणि नुकसानाची पातळी २५ ते ७० टक्क्यांपर्यंत पोहोचू शकते.

**आर्थिक नुकसानीची पातळी**

कीड नियंत्रणासाठी तातडीची कृती आवश्यक आहे,

जर कामगंध सापळ्यात सलग २ ते ३ दिवसांत ८ ते १० पतंग दिसले

**प्रत्येक मोटर ओळीवर २ अळ्या आढळल्या**

किंवा ५ टक्के शेंगा किडग्रस्त आढळल्या

एकात्मिक कीड व्यवस्थापन (खर्पींशसीरींशव झर्शीं चरपरसश-ाशपीं)

शेतीपूर्व तयारी

उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करून कीडीचे कोष नष्ट करा.

बियाण्यात १ टक्के ज्वारी किंवा बाजरीचे बी मिसळून पेरणी करा.

तुरीसोबत ज्वारी, बाजरी, मका, सोयाबीन यांसारखी आंतरपिके घ्या.

संपूर्ण गावात एकाचवेळी पेरणी करून क्षेत्रीय पद्धती अवलंबा.

**पिक व्यवस्थापन–** वेळेवर आंतरमशागत करून तणविरहित शेत ठेवा.मित्र कीडांचे संवर्धन करा (उदा. ट्रायकोग्रामा परजीवी).




शेंगा पोखरणाऱ्या अळ्यांच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टर लावा.

अळी नियंत्रण

मोठ्या अळ्या वेचून नष्ट करा.

शेंगा लागल्यावर झाड हलवून अळ्या गोळा करा आणि जमिनीत गाडा.

जैविक उपाययोजना

५ टक्के निंबोळी अर्क किंवा अझाडिरॅक्टिन ३०० पीपीएम ५० मि.ली. १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा.

एचएएनपीव्ही विषाणू ५ मि.ली. १० लिटर पाण्यात फवारणी करा.

रासायनिक कीटकनाशके (१० लिटर पाण्यासाठी प्रमाण)

कीटकनाशकाचे नाव प्रमाण

फ्ल्यूबेन्डामाईड ३९.३५% डउ २ मि.ली.

क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल १८.५% डउ ३ मि.ली.

इमामेक्टिन बेन्झोएट ५% डऋ ४.४ ग्रॅम

स्पिनोसॅड ४५% डउ २ मि.ली.

क्लोरॅन्ट्रानिलीप्रोल ९.३% + लॅमडा-सायहॅलोथ्रिन ४.६% नउ ४ मि.ली. टीप: वरील प्रमाण साध्या पंपासाठी आहे. पेट्रोल पंपासाठी हे प्रमाण तीनपट वापरावे.

**नियमित निरीक्षण करा**

पिकावरील कीड व रोगांचे निरीक्षण दर ५ दिवसांनी करा.

**प्रादुर्भाव वाढल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या–** शेंगा पोखरणारी अळी ही तुरीच्या उत्पादनावर मोठा परिणाम करणारी कीड आहे. वेळेवर प्रतिबंधात्मक उपाय, जैविक फवारण्या आणि एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब केल्यास नुकसान मोठ्या प्रमाणात टाळता येते.

(सौजन्य: पिकावरील कीड रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप), कृषि कीटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी)

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

आरोग्य संपदा आहार विशेष

## गरम पाण्यात मध घालून पिण्याचे दुष्परिणाम

***दि.९विदर्भ प्रजासत्ताक***

आयुर्वेदतज्ज्ञ डिंपल जांगडा यांनी याविषयीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये त्या सांगतात की जर तुम्ही गरम पाण्यात मध घालत असाल तर त्यामुळे गरम पाणी आणि मध यांची एक वेगळीच रिक्शन होते आणि त्यामुळे मधामधले पौष्टिक घटक कमी होतात.



त्याच्यामध्ये असणारे ण्टीऑक्सिडंट्स, एन्झाईम्स आणि बायोक्टीव्ह कंपाउंड नष्ट होऊन जातात. एवढंच नाही तर त्या रिक्शनमुळे तयार होणारे काही घटक तब्येतीसाठी हानिकारकही ठरू शकतात. म्हणूनच तज्ज्ञांच्या मते मध कधीही गरम पाणी तसेच गरम पदार्थांसोबत खाऊ नये.

ज्यांना वारंवार लर्जी होण्याचा त्रास असतो, त्या लोकांनीही मध आणि गरम पाणी हे कॉम्बिनेशन टाळायला हवं. जर तुम्हाला सकाळी मध आणि पाणी घ्यायचंच असेल तर पाणी खूप गरम करू नका.

ते अगदी हलकं कोमट करून फक्त रूम टेम्परेचरवर आणा. त्यानंतर त्यात मध घाला आणि मग ते पाणी प्या. पण या बाबतीतही तुमच्या डॉक्टरांचा सल्ला नक्की घ्यावा. सलाड, योगर्ट, फळं, स्मूदी यांच्यासोबत मध नॅचरल स्वीटनर म्हणून खाऊ शकता.

# मुंबईची नव प्रभातः भारत-ब्रिटन संबंधांसाठी 'ब्रिस्क' (BRISK) युगाची सुरुवात

मुंबई शहरात उत्साहाचे वातावरण आहे, कारण युनायटेड किंगडमचे (UK) प्रधानमंत्री केअर स्टारमर यांच्या दुसऱ्या दिवसाच्या दौऱ्यामुळे सर्वांचे लक्ष या शहराकडे लागून राहिले आहे. 'ग्लोबल फिनटेक फेस्ट'च्या भव्य समारोपाकडे सगळ्यांच्या नजरा खिळल्या आहेत. भारत आणि यूके यांच्यातील वाढत्या मैत्रीचे हे जोरदार प्रदर्शन आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि प्रधानमंत्री स्टारमर आज एकत्र मुख्य भाषण देणार आहेत. ही भेट केवळ एक औपचारिक राजनयिक शिष्टाचार नाही, तर शतकानुशतके चाललेल्या सहकार्याच्या विकासाचा आणि दोन्ही देशांमधील जुन्या नात्यातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा कळस आहे.

२०२५ हे वर्ष भारत आणि यूकेच्या संबंधांसाठी एक निर्णायक वळण ठरले आहे. अनेक शतकांचा इतिहास असलेल्या या संबंधाला आता औपचारिक 'कॉम्प्रेहेन्सिव्ह स्ट्रॅटेजिक पार्टनरशिप'चे रूप मिळाले आहे. 'भारत-यूके व्हिजन २०३५' या भागीदारीला मार्गदर्शन करत आहे, ज्यात दोन्ही देशांसाठी समान विकास आणि समृद्धीची योजना आहे. दोन्ही राष्ट्रांमध्ये भक्कम राजकीय इच्छाशक्ती असल्याने हे संबंध अधिक दृढ झाले आहेत. यावर्षी जुलैमध्ये प्रधानमंत्री मोदी यांनी यूकेचा दौरा केला, त्यानंतर प्रधानमंत्री स्टारमर यांचा भारत दौरा या भागीदारीला नवी गती देत आहे. हा दौरा दोन्ही देशांतील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण आणि मूर्त फायदे देण्याचे वचन देतो. उद्याचे (आजचे) भाषण, ज्यात १,००,००० हून अधिक जागतिक प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत, एका महत्त्वाच्या आंतरराष्ट्रीय मंचावर या भागीदारीची अविश्वसनीय क्षमता दर्शवणारा एक निर्णायक क्षण ठरेल.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींसाठी, ज्यांच्या राजनयिक प्रवासात जगभरातील धोरणात्मक भागीदारांशी संबंध अधिक घट्ट करण्याचा समावेश आहे, हा क्षण भारताच्या जागतिक महासत्ता म्हणून उदयास येण्याचे प्रतीक आहे. देशांतर्गत आर्थिक सुधारणांना पाठिंबा देण्यापासून ते जागतिक लोकशाही भागीदारांशी जोडणी साधण्यापर्यंत, प्रधानमंत्री मोदी यांच्या प्रयत्नांमुळे यूकेसोबतच्या या नूतनीकृत अध्यायाचा पाया रचला गेला आहे. यूके, ज्याचा भारताशी ऐतिहासिक आणि बहुआयामी संबंध आहे, आता समान भागीदार म्हणून पुढे आले आहे.

**आर्थिक वाढ आणि संधींसाठी इंजिन–** मुंबईतील या बहुप्रतिक्षित घोषणांचा आधार याच वर्षाच्या सुरुवातीला, २४ जुलै २०२५ रोजी, स्वाक्षरी झालेला 'व्यापक आर्थिक आणि व्यापार करार' आहे. अनेक वर्षांच्या तीव्र वाटाघाटीनंतर हा महत्त्वपूर्ण करार व्यापार क्षेत्राचे स्वरूप बदलणार आहे. भारतीय ग्राहक, उत्पादक आणि निर्यातदारांसाठी हा करार नवीन संधींचे दरवाजे उघडेल, ज्यामुळे अनेक उद्योग आणि लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडून येतील.

या करारामुळे यूकेच्या बाजारपेठेत प्रवेश करणाऱ्या ९९ टक्के भारतीय वस्तूंवरील सीमाशुल्क (Tariffs) संपुष्टात येईल. यात पारंपरिक भारतीय वस्त्रोद्योग, चामड्याच्या वस्तू, कृषी उत्पादने आणि ऑटोमोटिव्ह घटकांचा समावेश आहे. केवळ आकडेवारीच्या पलीकडे, या कराराचा उद्देश रोजगार निर्मिती करणे, नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन देणे आणि सर्व क्षेत्रांमध्ये समृद्धी वाढवणे आहे.

हा करार महत्त्वपूर्ण आकडेवारी दर्शवतो. द्विपक्षीय व्यापार सध्याच्या ४३ अब्ज पौंडांवरून वर्षाला २५.५ अब्ज पौंडांनी वाढण्याचा अंदाज आहे. याहूनही महत्त्वाचे म्हणजे, या करारामुळे कालांतराने भारताच्या वार्षिक सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) ५.१ अब्ज पौंडांची भर पडू शकते. या आकडेवारीमागे कारागिरांपासून ते तंत्रज्ञान स्टार्टअप्सपर्यंत, जागतिक बाजारपेठांमध्ये पोहोचण्याची कोट्यवधी भारतीयांची स्वप्ने दडलेली आहेत.

हा करार ४८ तासांच्या आत मालाच्या मंजुरीसाठी सीमाशुल्क प्रक्रिया सुलभ करण्याचे वचन देतो, ज्यामुळे लहान आणि मध्यम उद्योगांना (SME's) सामोरे जाव्या लागणाऱ्या लाल फितीच्या अडचणी कमी होतील. हे प्रधानमंत्री मोदी यांच्या 'व्यवसाय सुलभतेचे' (Ease of Doing Business) भारताला जगातील शीर्ष जागतिक व्यापार आणि गुंतवणूक केंद्र बनवण्याच्या दीर्घकाळच्या प्रयत्नांना प्रतिबिंबित करते.

प्रधानमंत्री मोदी यांच्या धोरणात्मक भाषणांमध्ये अनेकदा उद्धृत केले जाणारे 'व्यवसाय सुलभतेचे' हे सूत्र या करारामुळे नव्याने महत्त्वाचे ठरते, कारण हा करार केवळ मोठ्या उद्योगांनाच नव्हे, तर विशेषतः भारताच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या लहान आणि मध्यम उद्योगांनाही आधार देतो.

या कराराला यूकेमध्ये द्विपक्षीय पाठिंबा असल्याने राजकीय स्थैर्य सुनिश्चित होते, ज्यामुळे निवडणुकीच्या पलीकडेही या भागीदारीचे दीर्घायुष्य स्पष्ट होते. यूके ब्रेक्झिटनंतरच्या जागतिक दृष्टिकोनात भारताला किती महत्त्व देते, हे यातून दिसून येते.

**हिंद-प्रशांतमध्ये सुरक्षा बंधन मजबूत करणे–** ही भागीदारी केवळ अर्थव्यवस्थेपुरती मर्यादित नसून, संरक्षण आणि सुरक्षेच्या क्षेत्रातही पोहोचली आहे - जे 'व्हिजन २०३५'च्या रोडमॅपचा आधारस्तंभ आहे. हिंद-प्रशांत (Indo-Pacific) धोरणात्मक दृष्ट्या महत्त्वाचे केंद्र बनत असताना, दोन्ही देशांनी मुक्त, खुले आणि स्थिर प्रदेशासाठी एक समान दृष्टिकोन जपला आहे. अलीकडील नौदल सराव 'कोंकण २०२५'मध्ये हे चित्र स्पष्टपणे दिसले, जिथे भारताची आयएनएस विक्रांत आणि यूकेची एचएमएस प्रिन्स ऑफ वेल्स समन्वय साधून कार्यरत होती. ही कार्यात्मक समन्वयता दोन्ही सशस्त्र दलांमध्ये वाढती आंतरकार्यक्षमता (Interoperability) आणि प्रादेशिक शांततेसाठी त्यांची दृढ वचनबद्धता दर्शवते.

भारतीय वायुसेनेसोबतच्या हवाई संरक्षण सरावाने या सहकार्याला पूरक बनवले आहे. ही त्रि-सेवा समन्वयता या भागीदारीच्या खोलीचे दुर्मिळ उदाहरण आहे.याव्यतिरिक्त, जुलै २०२५ चा 'संरक्षण औद्योगिक रोडमॅप' खरेदीदार-विक्रेता गतिशीलता बदलून सह-विकास (Co-development) आणि संयुक्त उत्पादनाकडे एक मूलभूत बदल दर्शवतो. प्रधानमंत्री मोदी यांच्या 'आत्मनिर्भर भारत' या संकल्पनेशी जुळलेला हा रोडमॅप तंत्रज्ञान हस्तांतरण, संयुक्त संशोधन आणि भारताची देशांतर्गत संरक्षण उत्पादन क्षमता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो. यातून भारताला जागतिक संरक्षण नवोपक्रम आणि धोरणात्मक स्वायत्ततेत अग्रेसर भूमिका घेता येईल, तसेच मोठ्या प्रमाणात उच्च-कुशल रोजगार निर्माण होतील.

**'लिव्हिंग ब्रिज': चिरस्थायी लोक-ते-लोक जोडणी–** धोरणात्मक करारांपलीकडे, 'लोक-ते-लोक जोडणीचा चिरस्थायी 'लिव्हिंग ब्रिज' या भागीदारीचे हृदय आहे. यूकेमधील भारतीय डायस्पोरा स्थलांतरित भारतीय समुदाय), जो तेथील लोकसंख्येच्या २.६ टक्के आहे आणि ६५,००० हून अधिक व्यवसायांचे मालक आहेत, हे अमूल्य सामाजिक-आर्थिक बंधन दृढ करतात.

२०२५ मध्ये पुन्हा पुष्टी झालेली उच्च शिक्षण पात्रतेची परस्पर मान्यता भारतीय विद्यार्थी आणि व्यावसायिकांसमोरील अडथळे दूर करते, प्रतिभा गतिशीलता आणि शैक्षणिक देवाणघेवाण वाढवते. जागतिकीकरणाच्या जगात जिथे कौशल्ये आणि ज्ञान सीमा ओलांडतात, तिथे हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

'व्हिजन २०३५'च्या शैक्षणिक विस्ताराचे उदाहरण युनिव्हर्सिटी ऑफ साउथम्प्टनच्या गुरुग्राम कॅम्पसच्या जून २०२५ मधील उद्घाटनातून दिसते. हा उपक्रम जागतिक प्रतिभेचे संगोपन करतो आणि दूरदृष्टीच्या शैक्षणिक सहकार्याचे प्रतीक आहे.

याला पूरक म्हणून, भारत-यूके 'ग्रीन स्किल्स' भागीदारी नवीकरणीय ऊर्जा, शाश्वत शेती आणि पर्यावरणीय लवचिकतेमध्ये तरुणांची क्षमता विकसित करते – ज्यामुळे भविष्यातील जागतिक आव्हानांसाठी तयारी सुनिश्चित होते.

तंत्रज्ञान, नावीन्य आणि मुंबईच्या फिनटेक फेस्टमधील सामायिक भविष्य

या भागीदारीचे भविष्यवेधी लक्ष तंत्रज्ञान आणि नावीन्य आहे, जे ग्लोबल फिनटेक फेस्टमध्ये स्पष्टपणे दिसत आहे. १०० हून अधिक देशांतील ८०० हून अधिक स्पीकर्ससह, हा उत्सव प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर यांच्या दृष्टिकोनासाठी एक आदर्श मंच प्रदान करतो.

डिजिटल पेमेंट आणि आर्थिक समावेशनात भारताची अग्रणी भूमिका यूकेच्या जागतिक वित्तीय परिसंस्थेचे पूरक आहे, ज्यामुळे अधिक गहन तांत्रिक सहकार्याचा मार्ग मोकळा होतो.

'तंत्रज्ञान सुरक्षा उपक्रमा' द्वारे, दोन्ही देश दूरसंचार, कृत्रिम बुद्धिमत्ता (aI) मध्ये संयुक्त उपक्रम आणि सेमीकंडक्टर आणि खनिजांसाठी महत्त्वपूर्ण पुरवठा साखळी सुरक्षित करण्यावर भर देतात. लवचिक, अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली तयार करणे आता राष्ट्रीय सुरक्षा आणि आर्थिक वाढ जपण्यासाठी केंद्रस्थानी आहे.

हवामान कृती हा एक मुख्य आधारस्तंभ राहिला आहे. दोन्ही देश स्वच्छ ऊर्जा स्वीकार आणि ग्रीन फायनान्स बाजारपेठांना कुशल बनवण्यास गती देतात. बीपी (BP) आणि शेल (Shell) यांसारख्या यूकेच्या कंपन्यांची भारतातील स्वच्छ इंधन आणि इलेक्ट्रिक वाहन पायाभूत सुविधांमध्ये केलेली गुंतवणूक या उद्दिष्टांच्या दिशेने उचललेली व्यावहारिक पाऊले दर्शवते.

हवामान आणि नावीन्य यावरील आपल्या अनेक भाषणांमध्ये, प्रधानमंत्री मोदी यांनी असा दृष्टिकोन मांडला आहे जिथे आर्थिक वाढ आणि शाश्वतता (Sustainability) हातात हात घालून चालतात. ही द्विपक्षीय भागीदारी त्या दृष्टिकोनाला प्रतिबिंबित करते, ज्यामुळे ती जागतिक सहकार्यासाठी एक दीपस्तंभ ठरते.

**नव्या युगाची सुरुवात**

प्रधानमंत्री मोदी आणि स्टारमर आज आपले मुख्य भाषण देण्यासाठी सज्ज असताना, त्यांचा संयुक्त संदेश सामायिक मूल्ये आणि परस्पर लाभावर आधारित एका परिपक्व भागीदारीचे प्रतीक असेल. ही युती त्यांची एकत्रित आर्थिक ताकद, सुरक्षा सहकार्य, सांस्कृतिक संबंध आणि नावीन्यपूर्ण भावना यांचा फायदा घेते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अटळ धोरणात्मक दृष्टिकोनाच्या मार्गदर्शनाखाली, ही भागीदारी केवळ पुनरुज्जीवित झालेली नाही–तर एका नवीन युगासाठी तिची पुनर्कल्पना केली गेली आहे. एकत्र येऊन, भारत आणि युनायटेड किंगडम समृद्धी देण्यासाठी, सुरक्षा वाढवण्यासाठी आणि स्थिर आणि मुक्त जागतिक व्यवस्थेचे (Global Order) आधारस्तंभ टिकवून ठेवण्यासाठी सज्ज आहेत. त्यांची नूतनीकृत युती केवळ त्यांच्या लोकांचे भविष्यच नव्हे, तर आगामी दशकांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांचा मार्गही निश्चित करण्याचे वचन देते.

**ब्रिजेश सिंह (भा.पो.से.),**
प्रधान सचिव तथा महासंचालक
(माहिती व जनसंपर्क).

# 'तो बघ ससा' दिसला का?

आपण लहान होतो तेव्हा घरात, शेजारी किंवा शाळेत मोठी माणसं आपले कान पकडायची, थोडं वर उचलायची आणि गंमतीने विचारायची 'तो बघ ससा दिसला का?' आपणही निरागसपणे डोळे मोठे करून आकाशात, झाडावर किंवा दाराकडे बघत म्हणायचो, हो दिसला!तेव्हा आपण खुप भोळे होतो, त्या खेळात आपल्याला फसवणुक नव्हे तर प्रेम दिसायच. मोठ्यांना हसू यायचं आणि आपल्याला वाटायचं आपण काहीतरी खास पाहिलंय.

आज आपण मोठे झालो, शिक्षण घेतलं, जग पाहिलं. पण दुर्दैवाने तोच 'ससा दाखवायचा खेळ' आजही सुरू आहे. फक्त आता तो खेळ खेळणारे बदलले आहेत. आज ससा दाखवणारे म्हणजे आपले नेते, राजकारणी आणि सत्ताधारी झाले आहेत. त्यांच्याकडे अनुभव आहे, भाषण आहे आणि लोकांना पटवण्याची कला आहे.



ते म्हणतात, 'तो बघ विकास येतोय!'आपण टाळ्या वाजवतो.ते म्हणतात, 'तिकडे बघ नवे रोजगार येतायत!' आपण आशेने बघतो.ते म्हणतात, 'बघ शेतकऱ्यांच आयुष्य बदलतंय!' आपण पुन्हा विश्वास ठेवतो...आणि मग निवडणुका संपतात, ससा गायब होतो आणि आपण पुन्हा जुन्या वास्तवात परत येतो.

कधी धर्माचा, कधी जातीचा, कधी भावनांचा तर कधी राष्ट्रवादाचा असा प्रत्येकवेळी आपल्याला एक नवा ससा दाखवला जातो. आपण त्या खेळात इतके गुंततो की प्रश्न विचारायला विसरतो. आपल्याला वाटतं, 'यावेळी खरंच काहीतरी होईल.' पण प्रत्येकवेळी तेच घडतं ससा दिसतो आणि नंतर विरतो.

आता वेळ आली आहे हा खेळ ओळखण्याची.आपण ज्या देशात जगतो, त्या देशाचं भवितव्य फक्त टाळ्या वाजवणाऱ्या जनतेने ठरत नाही, तर प्रश्न विचारणाऱ्या जनतेने ठरतं. आता आपण 'हो दिसतोय' अस म्हणण थांबवायला हवं आणि 'खरंच कुठे आहे?' अस विचारायला हव.

बालपणात तो ससा नुसता कल्पनेत होता, पण आज दाखवले जाणारे ससे आपल्या भविष्याशी खेळत आहेत. म्हणून आता निरागसपणा नाही तर सजगता हवी. कारण जोपर्यंत आपण विचारत नाही, तोपर्यंत ससे दाखवणाऱ्यांच नाटक सुरूच राहणार आहे आणि लक्षात ठेवा ससा दिसतोय असं म्हणणं सोपं आहे, पण खरंच ससा शोधायचं धाडस फार कमी लोक करत असतात.

**–अवकाश कैलासराव बोरसे**
**९५८८६७६४५२–**

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ९ ऑक्टोंबर २०२५ शहर/ग्रामिण

# आईच्या अंधप्रेमाचा विकृत शेवट, प्रियकरासोबत मिळून केला मुलाचा खून

## २४ तासात पोलिसांनी केला गुन्ह्याचा उलगडाचार आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९धामणगाव रेल्वे**
प्रेम संबंधात अडसर ठरणाऱ्या आपल्या तरूण मुलाला त्याच्या आईने प्रियकराच्या मदतीने जीवे मारल्याची घटना ७ ऑक्टोबर रोजी सकाळी आसेगाव शेतशिवारात घडली. याप्रकरणात दत्तापूर पोलिसांनी तपासचक्राला गती देत चार मारेकऱ्यांना अटक करण्यात यश मिळविले. गणेश उर्फ शुभम गजानन वारंगणे (वय २६, रा. नारगावंडी), असे मृताचे नाव आहे. दत्तापूर येथील मनोज कीर्तन, मृताची आई दुर्गा गजानन वारंगणे, अमोल सुरेश अर्जुने (रा. जुना दत्तापूर) व अशोक उर्फ चिवडा व्यकंटराव चवरे (वय ६५, रा. नारगावंडी), अशी अटक आरोपींची नावे आहेत. गणेश उर्फ शुभम वारंगणे याची आई दुर्गा हिचे मनोज कीर्तनेयाच्यासोबत प्रेमसंबध होते. या प्रेमसंबंधाची कुणकुण गणेशला लागली होती. त्यामुळे तो त्याच्या आईला हटकत होता. मुलगा गणेश हा आपल्या प्रेमसंबंधात अडसर ठरत असल्याने मनोज कीर्तन व दुर्गाने त्याचा काटा काढण्याचा निर्णय घेतला. यासाठी अमोल अर्जुन व अशोक उर्फ चिवडा व्यकंटराव चवरे यांना मदतीला घेतले. ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ठरल्याप्रमाणे मनोज कीर्तन याने गणेश उर्फ शुभम याला आपल्या दुचाकीवर बसवून आसेगाव शेत शिवारातील शीतल गुप्ता यांच्या शेतात नेले. तिथे सर्वांनी मिळून गणेश उर्फ शुभम याचे हातपाय बांधून त्याला बेदम मारहाण केली. यात तो गंभीर जखमी झाला. त्याला गंभीर अवस्थेत धामणगाव रेल्वे येथील ग्रामीण रूग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीअंती डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. तसेच डॉ. आकाश येंडे यांनी याबाबतची माहिती दत्तापूर पोलिसाना दिली. पोलिसांनी सुरूवातीला आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. परंतु तपासानंतर ही हत्या असल्याची माहिती पोलिसाना मिळाल्याने दत्तापूर पोलिसानी तपासचक्राला गती दिली. हत्येचा गुन्हा दाखल करून अवघ्या २४ तासात चारही आरोपींना अटक करण्यात यश मिळविले.याकारवाईत दत्तापूरचे पोलीस निरीक्षक गिरीश ताथोड, सहायक पोलीस निरीक्षक गजानन गजभारे, पोलीस उपनिरीक्षक पुंडलिक चव्हाण, पोलीस कर्मचारी अतूल पाटील, हरिहर वैद्य, दीपक पंधरे, सागर कदम, नवनाथ खेडकर, पवन हजारे, किरण पवार, निलीमा खडसे, मयुर ढवक, पीयूष चौबे यांचा समावेश होता.



# पंचवटी, पीडीएमसी, हॉलीक्रॉस शाळा व आय.एम.ए. हॉल परिसरातील स्वच्छतेची पाहणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**
अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी आज शहरातील विविध भागातील स्वच्छतेची पाहणी केली. शहर स्वच्छतेसंदर्भात महानगरपालिका प्रशासन सातत्याने कार्यरत असून, त्याच अनुषंगाने आयुक्तांनी प्रत्यक्ष स्थळी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

या पाहणीत पंचवटी परिसर, पीडीएमसी परिसर, हॉलीक्रॉस शाळा परिसर तसेच कॅम्प रोड येथील आय.एम.ए. हॉल परिसर या ठिकाणांचा समावेश होता. पाहणीदरम्यान आयुक्तांनी रस्त्यावरील कचरा व्यवस्थापन, ओला-सुक्का कचरा विभाजन, डंपिंग स्थळांची स्थिती, तसेच नागरिकांच्या तक्रारींची नोंद घेतली.

आयुक्तांनी संबंधित झोन अधिकारी, स्वच्छता निरीक्षक व विभागीय कर्मचाऱ्यांना परिसरातील स्वच्छतेबाबत अधिक दक्ष राहण्याचे, तसेच कचरा वेळेवर उचलून योग्य प्रकारे विल्हेवाट लावण्याचे निर्देश दिले. तसेच, ज्या ठिकाणी कचऱ्याचे ढिगारे निर्माण झाले आहेत, तेथील साफसफाई तात्काळ करण्याचे आदेशही त्यांनी दिले व काही नियमित ठिकाणी कचरा स्पॉट चे सौंदर्यीकरण करण्याचे निर्देश खएउ अंतर्गत काम बघणारे प्रतिनिधी यांना दिले.

यावेळी आयुक्तांनी नागरिकांनाही आवाहन केले की, स्वच्छता ही सर्वांची जबाबदारी आहे. नागरिकांनी कचरा रस्त्यावर टाकू नये, तसेच ओला आणि सुका कचरा वेगळा करून महानगरपालिकेच्या वाहनांना द्यावा. शहर स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी ठेवण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे.

आयुक्तांच्या या प्रत्यक्ष पाहणीमुळे महानगरपालिका प्रशासनाच्या स्वच्छता मोहिमेला नवे बळ मिळाले असून, शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक विजय बुरे, स्वच्छ भारत मिशन अमरावती मनपा शहर समन्वयक श्र्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक व मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# दुस-या दिवशी लोकनृत्य, आदिवासी नृत्य,एकांकिका, मुकनाटए,नकला, संगीत, समूहगान वादविवाद,वक्तृत्व स्पर्धा

## स्थळचित्र कलाप्रकारात विद्यार्थ्यांचे बहारदार सादरीकरण



**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती** -संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा युवा महोत्सव -२०२५ अमरावती शहरातील श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयात सुरू असून युवा महोत्सवाच्या दुस-या दिवशी विद्याथ्र्यांनी लोकनृत्य, आदिवासी नृत्य,एकांकिका, मुकनाटए, नकला, पाश्चिमात्य वाद्य संगीत, शास्त्रीय वाद्यसंगीत (तालवाद्य), शास्त्रीय संगीत (स्वरवाद्य), भारतीय सुगम संगीत, भारतीय समूहगान वादविवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, स्थळचित्र, पोस्टर मेकिंग अशा विविध कलाप्रकारात आपल्या कलेचे बहारदार सादरीकरण केले.विद्यापीठाच्या युवा महोत्सवामध्ये विद्यापीठ परिक्षेत्रांतर्गत येणा-या अमरावती, यवतमाळ, अकोला, वाशिम आणि बुलडाणा या जिल्ह्यांच्या २०० महाविद्यालयांचे जवळपास पाच हजार विद्यार्थी, विद्यार्थीनी कलावंत मोठए संख्येने सहभागी झाले आहेत. महोत्सवाचे रितसर उद्घाटन झाल्यानंतर विद्याथ्र्यांच्या कलागुणांना वाव देणा-या कलाप्रकारास सुरुवात झाली. पहिल्या दिवशी विद्यार्थी कलावंतांनी लोक/आदिवासी नृत्य, एकांकिका, प्रहसन, मुकनाटए, भारतीय समूहगान, शास्त्रीय गायनामध्ये उत्तर भारतीय व कर्नाटकी गायन, भारतीय सुगम संगीत, पाश्चिमात्य समूहगान, पाश्चिमात्य एकल गायन अशा कला प्रकाराचे उत्कृष्टरित्या सादरीकरण केले. प्रश्नमंजुषामध्ये लेखी परीक्षा व त्यानंतर अंतिम फेरी घेण्यात आली. त्यानंतर चित्रकला व स्थळ छायाचित्रण अशा कला प्रकारामध्ये विद्याथ्र्यांनी आपल्या कलेचे सादरीकरण केले. १० ऑक्टोबर पर्यंत सदर युवा महोत्सव चालणार असून समारोपीय समारंभामध्ये युवा महोत्सवातील उत्कृष्ट सादरीकरण करणा-या संघाचा मान्यवरांच्या हस्ते गौरव केला जाणार आहे. युवा महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजयकुमार भांगडिया, विद्यापीठ विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांच्या नेतृत्वात निवड समिती अध्यक्ष निखिलेश नलोडे, सदस्य डॉ. सावन देशमुख, डॉ. शर्मिला देशमुख, डॉ. प्रशांत बागडे, श्री विजय शर्मा, डॉ. सीमा देशमुख, डॉ. निलेश कडू तसेच महाविद्यालयातील युवा महोत्सव समन्वयक डॉ. तीर्थराज राय, डॉ. माया वाटाणे, डॉ. सोनल चांडक, डॉ. सुनिता धोपटे, विद्यापीठातील श्री संतोष वानखडे, श्री सुधीर देशमुख आदी परिश्रम घेत आहेत.





# उपनिरीक्षकासह चार कर्मचाऱ्यांना शो-कॉज

## नागपुरीगेट ठाण्याच्या कोठडीतून आरोपी पसार झाल्याचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती-** पोलीस कोठडीतून आरोपी पसार झाल्याच्या प्रकरणात पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी पोलीस उपनिरीक्षक पंकज गुप्ता यांच्यासह इरफान रायलीवाले, विक्की नशिबकर आणि मोहन चव्हाण यांना शो-कॉज बजावली आहे तसेच गाडगेनगर उपविभागाच्या सहाय्यक पोलीस आयुक्तांकडे याप्रकरणाची चौकशी सोपविली आहे.नागपुरी गेट पोलिसांनी प्राणघातक हल्लूयाच्या गुन्ह्यात सोमवारी शेखसमीर शेख नवाब (क्य २२) याला अटक केली होती. त्यानंतर त्याला न्यायालयात हजर करायचे असल्यामुळे प्रथम त्याची वैद्यकीय तपासणी केली आणि त्याला पोलीस ठाण्यात आणले. त्याला तपास अधिकाऱ्याच्या लेखनीकाच्या स्वाधिन करण्यात आले. दरम्यान तपास अधिकारी व त्यांचा लेखनीक न्यायालयात जाण्याकरिता कागदपत्रे तयार करीत होते आणि आरोपी शेख समीर बाजूला बसलेला होता. दरम्यान काही वेळाने त्याने हातकडी काढली आणि पोलीस ठाण्यातून निघून गेला.

अखेर रात्री ९ वाजताच्या सुमारास नागपुरी गेट पोलिसांनी त्याला दर्यापूर येथील नातेवाईकाच्या घरातून अटक केली. परंतु तपास अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांचा हलगर्जीपणा प्रथमदर्शनी दिसून आल्याने आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यासह कर्मचाऱ्यांना शो कॉज बजाविली आहे. संबंधित प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश गाडगेनगर उपविभागाच्या सहाय्यकपोलीस आयुक्तांना दिले आहेत.

# अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा निधी दिवाळीपूर्वीच वितरित करा

## सुधाकर कोहळे व चंद्रशेखर भोयर यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती-** अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांचा टप्पा वाढ निधी तातडीने वितरित करण्यात यावा, या मागणीसाठी माजी आमदार सुधाकर कोहळे आणि भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सह संयोजक तसेच शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष चंद्रशेखर भोयर यांनी उपमुख्यमंत्री व वित्तमंत्री .ना. अजित पवार यांची मंत्रालयात भेट घेतली.या भेटीत सुधाकर कोहळे आणि चंद्रशेखर भोयर यांनी दिवाळीपूर्वीच निधी वितरित करण्याची मागणी केली. त्यांनी नमूद केले की, राज्य शासनाने दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार अंशतः अनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना टप्पा वाढ निधी देण्यास मान्यता दिली आहे; मात्र अद्याप निधी वितरित झालेला नाही. दिवाळीपूर्वी निधी मिळाल्यास शिक्षकांना आर्थिक दिलासा मिळून सण आनंदात साजरा करता येईल.



### सर्वांची दिवाळी गोड करणार : अजित पवार

या मागणीवर तत्काळ प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वित्त विभागाचे प्रधान सचिव ओ.पी. गुप्ता यांच्याशी थेट संपर्क साधून निधी संदर्भातील फाईल तातडीने पुढे पाठविण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या. तसेच, दिवाळीपूर्वीच हा निधी वितरित झाला पाहिजे, असे आदेशही त्यांनी दिले.या भेटीमुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत असून, निधी वितरणाची प्रक्रिया आता गती घेईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# १५ ऑक्टोबरपासून कापूस खरेदी केंद्र सुरू कपास किसान अॅपवर नोंदणी आवश्यक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती-** यावर्षीच्या हंगामात भारत कापूस महामंडळाकडून कापूस खरेदी होणार आहे. यासाठी जिल्ह्यात १४ केंद्र दि.१५ ऑक्टोबर पासून सुरू होणार आहेत. किमान आधारभूत दराने कापूस विक्रीसाठी शेतकऱ्यांना कपास किसान अॅपवर नोंदणी करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना ३१ ऑक्टोबरपर्यंत या अॅपवर नोंदणी करता येणार आहे.

कपास किसान मोबाईल अॅपवर नोंदणी केल्यामुळे शेतकऱ्यांना कापूस खरेदीसाठी वेळ आणि तारीख निश्चित केली जाणार आहे. निश्चित केलेल्या वेळेत कापसाची खरेदी होणार आहे. स्लॉट हे अॅप शेतकऱ्यांना त्यांच्या सोयीनुसार सात दिवसांच्या रोलींग आधारावर स्लॉटबुकींग करण्याची सुविधा देणार आहे. कापूस महामंडळात नोंदणी करतेवेळी शेतकऱ्यांच्या मोबाईलवर येणाऱ्या ओटीपीची आवश्यकता राहणार आहे. कापूसाची रक्कम फक्त शेतकऱ्यांच्या आधार लिंक बँक खात्यात जमा केली जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा मोबाईल नंबर आधारकार्ड आणि बँक खात्याशी लिंक असणे आवश्यक आहे.बन्नी ब्रह्मा आणि एच-४ या जातींसाठी, जर मायक्रोनेअर मूल्य मायक्रोनेअर मूल्य श्रेणीच्या बाहेर असल्यास त्यानंतर प्रत्येक ०.२ मायक्रोनेअर मूल्यासाठी, नियमानुसार किमान आधारभूत किंमतीतून अनुक्रमे २५ रूपये प्रति क्विंटलप्रमाणे कमी केले जाणार आहे.



### आधारभूत किंमत जाहीर

बन्त्री, ब्रम्हा यासाठी निश्चित केलेल्या मापदंडानुसार ८ हजार ११० रूपये, बन्नी, ब्रम्हा स्पेशलसाठी ८ हजार ६० रूपये, एच-४ साठी ८ हजार १० रूपये आधारभूत किंमत जाहीर करण्यात आली आहे. हे किमान आधारभूत दर ८ टक्के आर्द्रता असलेल्या कापूसासाठी लागू आहेत. कापसाच्या विक्रीसाठी कपाशीची कमाल आर्द्रता केवळ १२ टक्के पर्यंतच स्वीकार्य आहे. जर कापसाची आर्द्रता ८ टक्क्यापेक्षा जास्त असेल, तर प्रत्येक १ टक्के आर्द्रता वाढली तर किमान आधारभूत किंमत नियमानुसार १ टक्क्यांनी कमी केली जाणार आहे.

महामंडळ निकृष्ट दर्जाचा, विरंगित कापूस, पावसात, पाण्यात भिजलेला कापूस खरेदी करणार नाही. महामंडळ केवळ बाजार समित्यांद्वारे पडताळणी केलेल्या शेतकऱ्यांकडूनच कापूस खरेदी करणार आहे. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी महामंडळाला कापूस विकण्यापूर्वी बाजार समित्यांच्या अधिकाऱ्यांकडून त्यांची पडताळणी अवश्य करून घ्यावी, असे आवाहन भारतीय कापूस महामंडळाने केले आहे.

# विद्याभारती महाविद्यालयात आंतरमहाविद्यालयीन हॉकी स्पर्धा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती :** स्थानिक विद्याभारती महाविद्यालयामध्ये आंतर महाविद्यालयीन हॉकी स्पर्धेचे आयोजन ३ ते ५ ऑक्टोबर दरम्यान करण्यात आले होते.

या स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. प्रज्ञा येनकर, संस्थेच्या उपाध्यक्षा मेजर डॉ. मिथिलेश राठोर, डॉ. मोनाली घुरडे, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य एच. के. सिसोदीया, डॉ. साबीर अली, डॉ. डी. एस. वानखडे यांची उपस्थिती होती. या स्पर्धेत एकूण १४ महाविद्यालयाच्या हॉकी चमू सहभागी झाल्या होत्या. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी डॉ. मिथिलेश राठोर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी निवड समितीचे सदस्य डॉ. असलम खान, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षणविभाग संचालक डॉ. गजेंद्र रघुवंशी, डॉ. रेड्डी यांच्यासह महाविद्यालयाचे शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. डी. एस. वानखडे, संचालन प्रा. आदेश रक्षे तर आभार प्रदर्शन डॉ. साबीर अली यांनी केले.



# आश्वासन समितीने उच्च अधिकाऱ्यांची घेतली साक्ष

## तपोवन कुष्ठरुग्ण अहवाल मागितला, कफ सिरप, गुटखा विक्रीवर कडक भूमिका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ अमरावती**

महाराष्ट्र विधानभवनात बुधवारी (ता. आठ) विधानसभा आश्वासन समिती अध्यक्ष आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाशी संबंधित विविध प्रलंबित ३१ आश्वासनांच्या कार्यवाहीसंदर्भात उच्चस्तरीय बैठक झाली. या बैठकीस समितीचे सदस्य आमदार अमित झनक, विक्रम सातपुते, अमोल पाटील यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी व प्रशासनाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

बैठकीत आरोग्य विषयक महत्त्वाच्या मुद्यांवर सखोल चर्चा होऊन, तात्काळ अंमलबजावणीच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

कफ सिरप मृत्यू प्रकरणावर कडक भूमिका(कलर करणे): तामिळनाडू व मध्यप्रदेश राज्यांमध्ये कोल्ड्रीफ कफ सिरपमुळे घडलेल्या मृत्यू प्रकरणांची गंभीर दखल घेत अध्यक्ष रवी राणा यांनी महाराष्ट्रातील सर्व शासकीय व खासगी रुग्णालयांमध्ये दक्षता घेऊन तत्काळ व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे जनजागृती करण्याचे व अशा फसव्या औषध कंपन्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे लायसन्स रद्द करण्याचे निर्देश दिले.

### कुपोषणमुळे होणारे बालकांचे मृत्यू :

माखोडा (ठाणे), अचलपूर, मेळघाट (अमरावती), नंदुरबार येथील कुपोषित बालकांच्या मृत्यू प्रकरणांची दखल घेण्यात आली. वैद्यकीय अधिकारी गैरहजर राहणे व उपचारात दिरंगाई केल्याच्या कारणावरून संबंधित डॉक्टरांवर मोठ्या प्रमाणात दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे:

### गुटखा विक्रीवर कारवाईचे आदेश

राज्यात गुटखा बंदी असतानाही तो सर्रास विकला जात असून त्यामुळे कॅन्सर व मुखरोगांचे प्रमाण वाढले आहे. या पार्श्वभूमीवर अध्यक्षांनी एफडीए विभागासह पोलीस व आरोग्य विभागाला तातडीने संयुक्त कारवाई करून गुन्हे दाखल करण्याचे स्पष्ट आदेश दिले.



### कुष्ठरोग संस्थांच्या सुविधांबाबत विचारणा

: अमरावतीतील तपोवन येथील कुष्ठरोगच संस्थेतील रुग्णांची संख्या, उपलब्ध सुविधा व अडचणी संदर्भात समितीने माहिती मागवली असून, कुष्ठरोग्यांना पुरेशा सुविधा मिळत आहेत का, याची पडताळणी करण्यात येणार आहे.

### मलेरियामुळे मृत्यू प्रकरणात माहितीची मागणी:

गडचिरोली जिल्ह्यातील ऐटापल्ली तालुक्यातील बुर्गीटोला व पिंपळी बुर्गी या गावांमध्ये मलेरियामुळे झालेल्या मृत्यूसाठी जबाबदार ठरलेल्या डॉक्टरांवर करण्यात आलेल्या कारवाईबाबत समितीने संबंधित यंत्रणेकडून सविस्तर माहिती मागवली आहे.

बैठकीत विविध सार्वजनिक आरोग्य विषयकप्रलंबित आश्वासनांच्या कार्यवाहीबाबत सखोल चर्चा होऊन, जनतेच्या आरोग्याच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना राबविण्याचे आदेश अध्यक्ष रवी राणा यांनी अधिकाऱ्यांना दिले. बैठकीत ३३ मुद्यावर साक्ष घेतली जाणार आहे.

या बैठकीत अध्यक्ष आ. रवी राणा, आमदार राजेश पवार, समीर मेघे, अनुप अग्रवाल, विनोद अग्रवाल, विक्रम पाचपुते, सचिन कल्याण शेट्टी, पराग शहा, रमेश कराड, किशोर पाटील, अमोल पाटील, प्रदीप जयस्वाल, किरण सामंत, हिरामण खोसकर, संजय बनसोडे, दौलत दरोडा, वरूण सरदेसाई, अमित झनक, राजू खरे आदी समिती सदस्य आमदार उपस्थित राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

# श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुल येथे आजपासून पालखी पदयात्रा शिबिराला सुरुवात



**विदर्भ प्रजासत्ताकदि.९ गुरुकुंज मोझरी** २राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही ग्रामगीता तत्त्वज्ञान महायज्ञ व पालखी पदयात्रा शिबिर या पवित्र महोत्सवाला भक्तिभावाने प्रारंभ होईल. दिनांक ९, १० व ११ ऑक्टोबर या तीन दिवसांत होणाऱ्या या आध्यात्मिक शिबिरात समाजजागृती, मूल्यसंस्कार व ग्रामगीता विचारांचा प्रसार या माध्यमातून ग्रामविकासाचा संदेश दिला जाणार आहे.आज सकाळपासूनच परिसरात अध्यात्मिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध गावांमधून निघालेल्या पालख्यांचे गुरुकुंज मोझरी येथे आगमन सुरू झाले असून, आत्मानुसंधान भुवैकुंठ अड्याळ टेकडी येथील पालखीचे स्वागत उत्साह आणि भक्तिभावाने करण्यात येणार आहे. टाळमृदुंगांच्या निनादात संपूर्ण परिसर भक्तिमय झाला आहे.संध्याकाळी ६.३० वाजता सामुदायिक प्रार्थनेने कार्यक्रमाची सुरुवात होणार असून श्री नामदेवराव गव्हाळे महाराज 'प्रार्थनेवरील चिंतन' करणार आहेत. त्यानंतर शिरजगाव येथून आणलेला शिदोरी महाप्रसाद सर्व भक्तांना वितरित केला जाईल. रात्री ७.०० ते ११.०० या वेळेत होणाऱ्या कीर्तन कार्यक्रमात बाल कीर्तनकार आर्यन सुधीर निस्ताने, मा. श्रीकृष्ण महाराज झगेकर, मा. श्रीकृष्ण महाराज आखरे, मा. नामदेव महाराज माकोडे आणि मा. सुरेश महाराज उदार आपले कीर्तनातून ग्रामगीता तत्त्वज्ञान मांडतील. शदोरी महाप्रसादाची परंपरा पूज्य तुकाराम दादा गीताचार्य यांच्या संकल्पनेतून गेली ५० वर्षांपासून अखंड सुरू आहे. भक्तिभावाने चालणारा हा उपक्रम आजही भाविकांना एकत्र बांधतो आहे. या शिदोरीत प्रत्येक गावातील प्रत्येक घरातून भक्त हृदयपूर्वक योगदान देतात, आणि त्यातून सहकार्य हाच ईश्वरसेवेचा पाया हा सुंदर संदेश समाजात पोहोचतो.

पहिल्या दिवशी शिरजगाव मोझरी व दुसऱ्या दिवशी शिवणगाव येथून गावोगावातील भक्तांकडून गोळा झालेली शिदोरी गुरुकुलात आणून सर्व पदयात्री व भाविकांना प्रसादरूपाने दिली जाते. ही शंभर हातांनी साकारलेली भक्तीची चव आता गुरुकुलाची ओळख बनली आहे. राष्ट्रसंतांच्या विचारांचा प्रसार आणि प्रचार हाच या महोत्सवाचा प्राण आहे, असे श्री गुरुदेव अध्यात्म गुरुकुलाचे संपर्कप्रमुख श्री तुलसीदास झुंजुरकार यांनी सांगितले. हा केवळ धार्मिक सोहळा नसून, ही आत्मजागृतीची वाटचाल आहे. अनेक गुरुदेव भक्त, ग्रामस्थ, महिला मंडळे आणि युवक संघटनांचे अमूल्य श्रम व सहकार्य या कार्याला दिव्यता प्रदान करतात.

# अकोल्यातील आलेगाव हादरले:ओबीसी आरक्षणाला धक्का नको, जातीय जनगणना करा!

## भावनिक आवाहन करत भुजबळांच्या खंद्या समर्थकाची आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अकोला–** ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये', 'जातीय जनगणना झाली पाहिजे' आणि 'आमचं जीवन जगण्याचा अर्थ नाही' असे म्हणत अकोला जिल्ह्यातील आलेगाव येथील शेतकरी विजय बोचरे (वय ५९) यांनी ९ ऑक्टोबरच्या पहाटे आलेगाव बस स्थानकावरील प्रवासी निवाऱ्यात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणारे आणि कॅबिनेट मंत्री छगन भुजबळ यांचे खंदे समर्थक म्हणून ओळखले जाणारे बोचरे यांचे हे पाऊल संपूर्ण परिसराला हादरवून गेले आहे.

**आत्महत्येपूर्वी मोबाइलवर भावनिक स्टेटस**

आत्महत्येपूर्वी विजय बोचरे यांनी आपल्या मोबाइलवर सलग तीन भावनिक स्टेटस पोस्ट केले होते. पहाटे अडीचच्या सुमारास त्यांनी हे संदेश स्टेटसला ठेवून त्यानंतर काही वेळातच गळफास घेतला. त्यांनी मुख्यमंत्री आणि ओबीसी नेत्यांना उद्देशून लिहिले होते की,

राज्य सरकारने मराठा आरक्षणाच्या संदर्भात घेतलेल्या निर्णयामुळे ओबीसी समाजात असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.




आमच्या मुला-बाळांचं भविष्य धोक्यात आलं आहे. शिक्षणात, नोकरीत आणि राजकारणात आमचं स्थान हरवत चाललं आहे. आमचं जीवन जगण्याचा अर्थ नाही.

जय ओबीसी, जय संविधान. त्यांनी पुढे स्पष्ट आवाहन केलं होतं की, जातीय जनगणना झाली पाहिजे आणि ओबीसी आरक्षणाला धक्का लागू नये.

घटनेची माहिती मिळताच पोलिस स्टेशन चान्नी येथील कर्मचारी तत्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह खाली उतरवून शवविच्छेदनासाठी अकोला येथील सर्वोपचार रुग्णालयात पाठविला. या प्रकरणी चान्नी पोलिस अधिक तपास करीत आहेत.

### ओबीसी समाजात संताप

विजय बोचरे यांच्या आत्महत्येने आलेगावसह पातूर तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे. गावातील नागरिकांनी सांगितले की, बोचरे हे मेहनती शेतकरी, तसेच ओबीसी समाजाच्या हक्कांसाठी नेहमी सक्रिय असणारे कार्यकर्ते होते. त्यांचे समाज-प्रेम आणि न्यायासाठीचे भान सर्वांना प्रेरणादायी होते. त्यांच्या आत्महत्येने आलेगाव हादरले आहे.-

# जि. प., पं. स. निवडणुकीसाठी प्रारूप मतदारयादी जाहीर

## हरकतींसाठी १४ ऑक्टोबरपर्यंत मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकांकरीता राज्य निवडणूक आयोगाने दि १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदारयादी जिल्हा परिषद व त्याअंतर्गत येणाऱ्या पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी वापरण्यात येणार आहे.

निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदारयादी बुधवारी (ता. आठ ऑक्टोबर) प्रसिद्ध करण्यात आली. त्यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १४ ऑक्टोबरपर्यंत मुदत निश्चित करण्यात आलेली आहे. निर्वाचक गणनिहाय मतदारयाद्या अंतिम व अधिप्रमाणित करून त्या २७ ऑक्टोबरला प्रसिद्ध करणार आहे. त्याच दिवशी मतदान केंद्राची व मतदान केंद्रनिहाय यादी कार्यालय, प्रसिध्द केली जाईल. निर्वाचक गणनिहाय प्रारुप मतदारयादीची हार्ड कॉपी जिल्हाधिकारी जिल्हा परिषद कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती, ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी, तसेच पीडीएफ कॉपी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालयातील संकेत स्थळ इत्यादी ठिकाणी प्रसिध्द करण्यात आली आहे.हरकती किंवा सूचनांमध्ये लेखकांच्या चुका, दुसऱ्या गटात, गणात चुकून अंतर्भूत झालेले मतदार, विधानसभा यादीत नाव असूनही संबंधित गण, विभाग यादीत नाव समाविष्ट करण्याचे राहून गेलेले मतदार तसेच दुबार मतदार म्हणून नोंद झाल्यास त्यांना कोणत्या गटात मतदान करायचे आहे, यासंबंधीच्या हरकतींचा समावेश आहे.आगामी जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये मतदाराचे नाव मतदार यादी मध्ये नाही अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त होऊ नये, यासाठी सर्व मतदार व राजकीय पक्ष यांनी खबरदारी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी केले आहे.



# बासपाणी गावात प्रभुदास भिलावेकर यांच्या उपस्थिती दारू बंदी ची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९धारणी–** धारणी शहारा लगत असलेल्या बासपाणी गावातील नागरिकांनी मेळघाट जिल्ह्याचे भारतीय जनता पार्टी अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत गावात दारू बंदीची घोषणा केली. गावात दारूचे होणारे दुष्परिणाम बघता दारू बंदी करणे आवश्यक झाल्याचे गावातील प्रतिष्ठित नागरिकांनी आपली प्रतिक्रिया दिली, दारू बंदीसह गाव व्यसनमुक्त बनविण्याचा आमचा संकल्प असेल असे गावकरी बोलले, दारूमुळे अनेक कुटुंब बर्बाद झाल्याचे उदाहरणे आहे, म्हणून गावात दारू बंदीचा निर्णय घेण्यात आला. जो कोणी दारू पिऊन अथवा कोणाच्या घरी दारू आढळल्यास त्यावर विशेष दंडात्मक कार्यवाही करण्याचा निर्णय सुध्दा गावकऱ्यानी यावेळी घेतला, जिल्हा अध्यक्ष प्रभुदास भिलावेकर यांनी बासपानी येथील दारू बंदी निर्णय लोकहिताचे असल्याने सर्व नागरिकांचे मनपूर्वक आभार मानले, मी जेव्हा आमदार होतो त्यावेळेस मेळघाटातील अनेक गावात दारू बंदी करण्यात आले होते, आता जी गावे दारू बंदी पासून वंचित आहे. त्या सर्व गावांनी तत्काळ आपल्या गावात दारू बंदी चा निर्णय घ्यावा असे आव्हान या वेळी भिलावेकर यानी केले. यावेळी मोठ्या संख्येने गावकरी उपस्थित होते, सोबतच ग्राम पंचायत सरपंच, पोलीस पाटील, आळा पटेल, भाजपाचे नेते साबुलाल जी पाटणकर, येणोरकर सर उपस्थित होते.



# एकाच कॅम्पसमधील शाळांचे एकत्रिकरण आणि कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचे शिक्षण आयुक्तांचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताकदि.९पुणे**

महाराष्ट्र राज्याचे शिक्षण आयुक्त यांनी दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित आभासी सभेमध्ये राज्यभरातील शैक्षणिक पुनर्रचनेबाबत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. शिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणा करण्याच्या उद्देशाने आणि शैक्षणिक संसाधनांचा प्रभावी वापर करण्याच्या दृष्टीने काही निर्णायक निर्णय घेण्यात आले आहेत.या निर्देशांनुसार, एकाच कॅम्पसमध्ये कार्यरत असलेल्या अनेक शाळा बंद करून त्यांचे एकाच शाळेत रूपांतर करण्यात येणार आहे. तसेच, ० पटसंख्या व १ ते ५ पटसंख्या असलेल्या शाळा तात्काळ बंद करण्यात येणार असून, या शाळांमधील विद्यार्थ्यांचे समावेशन जवळच्या कार्यरत शाळांमध्ये केले जाणार आहे.विद्यार्थ्यांना होणाऱ्या संभाव्य अडचणी लक्षात घेऊन, गरज असल्यास समाविष्ट विद्यार्थ्यांना दरमहा ६००/- इतका वाहतूक भत्ता देण्याची तरतूद करण्याचेही निर्देश देण्यात आले आहेत.



यासंदर्भातील प्रस्ताव संबंधित शैक्षणिक अधिकाऱ्यांनी तात्काळ सादर करावेत, असे स्पष्ट करण्यात आले आहे.तसेच, बंद करण्यात आलेल्या शाळांचे ण-ऊखडए क्रमांक रद्द करण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया देखील तातडीने सुरू करण्यात येणार आहे.या निर्देशांमध्ये आणखी एक महत्त्वाचा निर्णय म्हणजे स्वतंत्र कन्या शाळांचे सहशिक्षण शाळांमध्ये रुपांतर करण्याबाबतची कार्यवाही – जी लवकरच अंमलात आणली जाणार आहे.या निर्णयामुळे शिक्षण व्यवस्थेत कार्यक्षमतेचा नवा अध्याय सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# राष्ट्रसंतांच्या साहित्यांचा अभ्यास करून महिलांनी सक्षमीकरण करणे आवश्यक

## महिला मेळाव्यात विविध महिला वक्त्यांचा एक सूर, मान्यवरांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९गुरुकुंज मोझरी**

'राष्ट्रसंतांच्या साहित्याचा अभ्यास करून महिलांनी सक्षमीकरण केले पाहिजे. महिला कुटुंबाचा आधारस्तंभ असल्याने त्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घेतली पाहिजे. स्वतःच्या संततीला संपत्ती नाही, दिली तरी चालेल. परंतु संस्कार मात्र दिले पाहिजे' असे प्रतिपादन विविध महिला वक्त्यांनी केले.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त आयोजित महिला मेळाव्यामध्ये केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



संचालक मंडळाच्या अध्यक्ष पुष्पा बोंडे होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून पौर्णिमा सवाई, आसावरी देशमुख, शोभा देशमुख, प्रभा आवारे, सरपंच वैशाली धुमोणे, गौरी देशमुख, संगीता शिंदे, द्वारका गोहत्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावर्षीच्या संमेलनात विशेष उपक्रम म्हणून राष्ट्र संतांचे साहित्य नवनवीन महिलांपर्यंत पोहचावे. याकरिता या संमेलनात राष्ट्रसंतांच्या साहित्यावर आधारित पाठांतर स्पर्धा ठरविण्यात आली होती. या स्पर्धेसाठी ग्रामगीतेतील अकरा ओव्या, लहर की बरखेतील एक श्लोक, आदेश रचनेतील एक श्लोक आणि एक अभंग पाठांतर करायचा होता. यामध्ये तालुक्यातील ४१ महिलांनी सहभाग घेतला. त्यापैकी प्रथम क्रमांक सुलोचना धंदर, द्वितीय रोशनी तायडे, तिसरा सरला बालपांडे, चवथा पल्लवी निकम, पाचवा सविता चिकटे, सहावा उषा बोडखे यांना मिळाला. त्यांना पुष्पा बोंडे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. इतर सहभागी महिलांना राष्ट्रसंतांचे साहित्य प्रदान करण्यात आले. तत्पूर्वी जया सोनारे यांच्या अभंग गायनाचा कार्यक्रम झाला. तर स्थानिक बालकलाकारांनी राष्ट्र संतांची भजने सादर केली.

# ऑनलाइन व्यवहारातून वृद्धाची ४ लाखांनी केली फसवणूक

## तक्रारीवरून अज्ञातावर दर्यापूर पोलिसात गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ दर्यापूर**



जुनी नाणी आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत चांगल्या किंमतीने विकायचे आमिष देत एका अज्ञाताने सेवानिवृत्त वृद्धाची ४ लाख १९,५८४ रुपयांनी ऑनलाइन फसवणूक केली. ही घटना तालुक्यातील लेहगाव रेल्वे येथे घडली. याबाबत वृद्धाने दर्यापूर पोलिसात तक्रार नोंदवली. शेषराव श्रीहरी पाचुरकर (वय ६७, रा.लेहगाव (रेल्वे), ता. दर्यापूर) असे फसवणूक झालेल्या वृद्धाचे नाव आहे.

तक्रारदार पाचुरकर यांच्याकडे काही जुनी नाणी आहेत. त्यांनी ती विकायची असल्याची माहिती समाज माध्यमावर दिली. त्या माहितीच्या आधारे एका अज्ञाताने त्यांच्याशी फोनद्वारे संपर्क साधला. त्यांच्याजवळील नाण्यांची किंमत त्याने ८२ लाख ४० हजार सांगितली. त्यासाठी किती पैसे भरावे लागतील, अशी विचारणा तक्रारदाराने अज्ञाताला केली. त्याने एकही पैसा भरावा लागणार नाही म्हणून सांगितले. त्याने तक्रारदाराला आधार कार्ड, पॅन कार्ड व बँक खात्याचा तपशील व्हाट्स अॅपवर पाठवण्यास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी सर्व माहिती त्याला पाठवली. इथेच त्यांची फसगत झाली. अज्ञाताने त्यांच्या खात्यातून ४ लाख ११,५८४ रुपये काढून घेत आर्थिक फसवणूक केली. त्यांच्या तक्रारीवरून दर्यापूर पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा नोंदवला असून, या घटनेचा पुढील तपास ठाणेदार सुनील वानखडे करीत आहे.

# पूर्वी नागपूरपासून प्रवाशांची झुंबड आता अमरावतीतूनच होणार गर्दी

## जबलपूर एक्स्प्रेसचेही आरक्षण झाले फुल्ल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



नागपूरपर्यंत रिकामी धावणारी अमरावती–जबलपूर एक्स्प्रेसचेही दिवाळीत आरक्षण फुल्ल आहे. अमरावतीकर सायंकाळी ४.४५ वा. निधणाऱ्या या जबलपूर एक्स्प्रेसचा वापर हा नागपूरपर्यंत जाण्यासाठी करीत असतात, अमरावतीहून जबलपूरला जाणारे प्रवासी कमी असतात. त्यामुळे अनारक्षित कोच वगळता इतर आरक्षित कोच हे रिकामे असतात. ही रात्री ८.१० वाजताच्या सुमारास नागपूर स्टेशनवर पोहोचते. तेथून निघाल्यानंतर दुसऱ्या दिवशी पहाटे ५५० वा, जबलपूर स्टेशनवर तिचे आगमन होते. त्यामुळेनागपुरातून जबलपूर एक्सप्रेसने प्रवास करणाऱ्यांची संख्या ही जास्त आहे. प्रवाशांच्या उड्या पडतात. मात्र, यावेळी दिवाळीच्या दोन दिवस आधीपासून ते चार दिवस नंतर अमरावतीतूनच जबलपुर एक्सप्रेसचे आरक्षण फुल्ल झाले आहे. यात एजंटचीही कमाल असू शकते. नागपुरातून कन्फर्म तिकीट मिळालेनाही तर ते अमरावतीतून कन्फर्म तिकीट बुक करीत असावेत, असा अंदाज वर्तवला जात आहे. कारण, दिवाळीच्या कालावधीत प्रवासी कन्फर्म तिकीट मिळवण्यासाठी २०० ते ४०० रु. सहज जास्तीचे देतात. अमरावतीतून जबलपूर जाणारे प्रवासीही आहेत. परंतु, त्यांची संख्या मोजकीच आहे. त्या तुलनेत – नागपुरातून प्रवासी गृहनगर – जबलपूरला जातात. दिवाळी साजरी करून परत येतात. त्यांना दिवाळीच्या कालावधीत नागपूर कोटा फुल झाला की, अपेक्षित तारखेला आरक्षित तिकीट मिळत नाही. त्यामुळ अमरावती कोट्यातून ते तिकीट एजंटकडून बुक करतात.

# मनपा, वाइल्डलाईफ अँड एन्व्हायरन्मेंट कंझर्व्हेशन सोसायटीत सामंजस्य करार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

माझी वसुंधरा भयान ६.० अंतर्गत अमरावती शहरात वन्यजीव व पर्यावरण संवर्धन उपक्रमांना चालना देण्यासाठी महानगरपालिका आणि वाइल्डलाईफ अँड एन्व्हायरमेंट कंझर्व्हेशन सोसायटी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. हा करार मनपा कार्यालय येथे झाला.

या सामंजस्य कराराचा उद्देश शहरात जैव विविधतेबाबत जनजागृती करणे, नागरिकांचा सहभाग वाढवणे आणि पर्यावरणपूरक उपक्रमांना प्रोत्साहन देणे हा आहे. या अनुषंगाने सिटी बर्ड इलेक्शन महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन तसेच विविध जनजागृती कार्यक्रम राबविण्यात येतील. सिटी बर्ड इलेक्शन या उपक्रमांतर्गत अमरावतीतील सहा सामान्य पक्ष्यांची नावे नामांकनासाठी निवडण्यात येतील. शाळा,महाविद्यालये आणि नागरिकांच्या ऑनलाईन सहभागातून निवडणुकीद्वारे शहराचा अधिकृत पक्षी घोषित करण्यात येईल. निवड झालेल्या पक्ष्याची शिल्पे शहरातील प्रमुख ठिकाणी उभारण्यात येतील. महाराष्ट्र पक्षीमित्र संमेलन' या राज्य स्तरीय परिषदेत पक्षीप्रेमी, तज्ज्ञ, पक्षीतज्ज्ञ व संवर्धन कार्यकर्ते सहभागी होतील. या माध्यमातून पक्षी संवर्धन, निरीक्षण आणि नागरिकांची भूमिका यावर विचारमंथन होईल. याशिवाय, बर्ड वॉक, बटरफ्लाय वॉक आणि टॉक विथ अ ट्री यांसारखे नागरिक सहभागावर आधारित कार्यक्रम वर्षभर आयोजित केले जातील. हा सामंजस्य करार मनपा आयुक्त सौम्या शर्मा आणि डॉ. जयंत वडतकर यांच्या हस्ते स्वाक्षरीत झाला. यावेळी उपआयुक्त नरेंद्र वानखेडे, पशुशल्य चिकित्सक डॉ. सचिन बोंद्रे, डॉ. मंजुषा वाठ, डॉ. श्रीकांत वहेंकर आणि अॅड. राजमेहर निशाने उपस्थित होते.

# विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात राष्ट्रीय पोषण माह निमित्त प्रदर्शनी


## 'स्वस्थ नारी सशक्त परिवार अभियान' आरोग्य प्रदर्शन, समुपदेशन, पोषण आहार प्रदर्शन स्थळी रुग्णांना 'ऑन दी स्पॉट' मार्गदर्शनाचा लाभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**




विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती तर्फे राष्ट्रीय पोषण माह निमित्ताने महिला व बाल विकास विभागाच्या वतीने प्राप्त दिशा निर्देशानुसार यावर्षी शरीं ीळसहीं षीं र लर्शीशि श्रळषश या उद्देशाने १३ सप्टेंबर २०२५ ते १२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत पोषण माह साजरा करण्याचे ठरवले आहे. अर्थातच या मागील उद्देश म्हणजे चांगल्या आरोग्यासाठी योग्य आहार घेणे हा असून संपूर्ण स्वास्थासाठी पोषणाची भूमिका यावर प्रकाश टाकणे होय.आपण आयुष्य जगताना कसलीच चिंता नसावी, शरीराने साथ द्यावी आणि आपण आपल्या कुटुंबीयांसोबत आणि मित्रांसोबत आनंदाने दीर्घायुष्य जगावं असं वाटतं. पण जसजसं वय वाढतं तसतसं शरीर थकत जातं. पण काळजी करु नका, अशा वाढत्या वयातही आपली तब्येत ठणठणीत राहील ह्यासाठी ह्या काही गोष्टी लक्षात घ्या. विशेषतः वाढत्या वयासाठी काही विशेष जीवनसत्व अधिक आवश्यक असतात आणि योग्य आहार सुद्धा.उत्तम आरोग्यासाठी आपल्याला रोज ४० ते ५० विविध पोषक घटकांची गरज असते. त्यासाठी रोजच्या आहारात विविधता ठेवणे महत्वाचे आहे. ही विविधता ठेवण्याचा सोपा उपाय म्हणजे आहारात विविध भाजीपाला आणि फळांचा समावेश करावा. बदलत्या जीवनशैलीनुसार आहाराकडे होणारे दुर्लक्ष, वाढते आजार आणि दिवसेंदिवस खालावत चाललेले महिला आरोग्य यासाठी आहारविषयक जागरुकता निर्माण करण्यासाठी जागतिक स्तरावर दरवर्षी सप्टेंबर महिना हा ' जागतिक पोषण महिना ' म्हणून साजरा केला जातो. महिलांनी पोषण आहार आणि आरोग्य जपण्यासाठी संतुलित आहार मूल्यवर्धित पदार्थांचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. चांगल्या आरोग्यासाठी विविध रंगांची फळे आणि भाजीपाल्याचा आहारात समावेश करावा. भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेने २०२० मध्ये भारतीयांसाठी अन्न पिरॅमिड आणि आहाराविषयी मार्गदर्शक तत्वे जारी केली आहेत. हा पिरॅमिड संतुलित आहाराचे महत्व दर्शवतो. पिरॅमिडच्या तळाशी असलेले अन्न सर्वात सर्वात जास्त प्रमाणात सेवन केले पाहिजे, तर सर्वांत वर असलेले अन्न सर्वात कमी प्रमाणात खाल्ले पाहिजे.अनेक आहारतज्ञ् वेळोवेळी आपल्याला फळे आणि भाजीपाला आहारात समावेश करण्याची शिफारस करतात. पण आरोग्यासाठी कोणती फळे किंवा भाजी खाणे फायदेशीर ठरेल, हे कसे समजणार? यासाठीच केंद्र सरकारच्या पुढाकाराने स्वस्थ नारी सशक्त परिवार ' अभियान अंतर्गत विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे आरोग्यवर्धक प्रदर्शनी लावण्यात आली आहे. राष्ट्रीय पोषाहार सप्ताह ( १ ते ७ सप्टेंबर ) अर्थातच राष्ट्रीय पोषण माह हे कुपोषणावर मात करण्यासाठी आणि समाजात संतुलित आहाराबाबत जनजागृती करण्यासाठी राबवले जातात. कुपोषणासारख्या समस्यांवर मात करणे आणि लोकांना संतुलित आहाराचे महत्व पटवून देणे हा याचा मुख्य उद्देश आहे. हा सप्ताह दरवर्षी १ ते ७ सप्टेंबर दरम्यान साजरा केला जातो. या निमित्याने विविध उपक्रम राबवले जातात. या अंतर्गत या निमित्याने घोषवाक्य, रांगोळी आणि पोस्टर स्पर्धा आयोजित केल्या जातात. तसेच गर्भवती महिलांसाठी पोषण प्रदर्शनी भरवली जाते. राष्ट्रीय पोषण हे अभियान भारत सरकारने ८ मार्च २०१८ रोजी सुरु केले. याचे उद्दिष्ट म्हणजे मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला आणि स्तनपान करणाऱ्या मातांसाठी पोषण सुधारणे हे याचे प्रमुख ध्येय आहे. महिला आणि बालविकास मंत्रालय हे राष्ट्रीय पोषण माह साजरा करण्याचे मुख्य काम करते. आणि सर्व स्तरांवर पोषण सुधारण्यासाठी विविध कार्यक्रम राबवते. थोडक्यात, पोषण सप्ताह, आणि पोषण अभियान हे दोन्ही कुपोषणाविरुद्ध लढण्यासाठी आणि देशभरात निरोगी व संतुलित आहाराबद्दल जागरुकता निर्माण करण्यासाठी महत्वाचे उपक्रम आहेत. पोषण अभियान, समग्र पोषणासाठी एक व्यापक योजना आहे जी भारत सरकारची मुले, किशोरवयीन मुली, गर्भवती महिला आणि स्तनपान करणाऱ्या मातांसाठी पोषण परिणाम सुधारण्यासाठी एक प्रमुख योजना आहे. हे अभियान माननीय पंतप्रधानांनी ८ मार्च २०१८ रोजी सुरु केले होते. पोषण अभियानाचा उद्देश आरोग्य, निरोगीपणा आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढवणाऱ्या पद्धती विकसित आणि प्रोत्साहन देण्यासाठी एक अभिसरण परिसंस्था तयार करून पोषण सामग्री आणि वितरणात धोरणात्मक बदल करून कुपोषणाच्या आव्हानांना तोंड देणे आहे. पोषण आहार म्हणजे शरीराला ऊर्जा आणि आवश्यक जीवनसत्वे, खनिजे, प्रथिने व कर्बोदके पुरवणारा आहार. निरोगी आरोग्यासाठी आणि शरीराची वाढ व विकास यासाठी पोषक आहाराचे सेवन महत्वाचे आहे. आहारात फळे, भाज्या, संपूर्ण धान्य यांसारख्या पौष्टिक घटकांचा समावेश असावा, जो जंक फुड टाळून संतुलित आणि पौष्टिक अन्न देतो. आहार जेवढा सात्विक तेवढा आपल्यासाठी अधिक चांगला. भगवतगीतेमध्ये उल्लेख आहे की आहाराचा आपल्या मन आणि बुद्धीवर परिणाम होतो. मन आणि बुद्धी सात्विक करण्यासाठी आहार सुद्धा सात्विक असावा. आहार बनवताना ईश्वराचे स्मरण करत आहार बनवला तर तो प्रसाद होतो. आहार हे भोजन असून ते इतर अनेक शास्त्रांवर आधारलेले आहे.यामध्ये अनेक अन्न पदार्थांची उपलब्धता आहे. याचा आपल्या आरोग्यासाठी आणि वाढी साठी उपयोग होतो. आहारशास्त्र हे रसायनशास्त्र, जीवशास्त्र, शरीरशास्त्र इत्यादी शास्त्रांवर आधारलेले आहे. सर्व जीवनसत्वे व खनिजे असलेल्या, शरीरास पूरक असलेल्या संपूर्ण जेवणास आहार असे म्हणतात. रोजच्या जेवणात पोषक आहार अत्यंत महत्वाचा असतो. अलीकडील काळात जंक फुड आरोग्यास अतिशय हानिकारक आहे. रोजच्या आहारात कच्च्या पालेभाज्या व भारतीय पद्धतीच्या कोशिंबिरीचे वेगवेगळे प्रकार खावेत. रोजच्या जेवणात गाजर, काकडी, मुळा वगैरे खाणे खूप महत्वाचे असते. याचे महत्व पटवून देण्यासह विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे आहारतज्ञ् म्हणून कार्यरत – कविता देशमुख व रश्मिता विलासराव दिघडे यांनी राष्ट्रीय पोषण माह चे महत्व अधोरेखित करण्यासह यावेळी दिली.

# संगई कन्या शाळेने जोपासला पारंपरिक भुलाबाईचा उत्सव




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अंजनगाव सुर्जी**

अनोखा, भुलाबाईचा सण लोककलेचा गंध भारी, वारसा हा लोकसंस्कृतीचा, ठेवू जपू सदा मनी, असे म्हणत भुलाबाईचा सण साजरा करण्यात येतो. भारतीय संस्कृतीतील परंपरागत सणांना नवसंजीवनी देण्याच्या उद्देशाने सीताबाई संगई कन्या शाळेत बाहुल्यांचा उत्सव व भुलाबाईचा खेळ' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

बाहुल्यांचा उत्सव हा लहान मुलींच्या आनंदाचा, संस्कारांचा आणि खेळांचा सण मानला जातो. आधुनिकतेच्या युगात हा सण लोप पावत असताना, सीताबाई संगई कन्या शाळेने या परंपरेचे पुनरुज्जीवन घडवून आणले, इयत्ता पाचवीच्या विद्यार्थिनींनी रंगीबेरंगी बाहुल्यांची आकर्षक सजावट करून वातावरण उत्साही केले. वर्ग पाच ते सातवीच्या विद्यार्थिनींनी बाहुल्यांची गाणी गायली, पारंपरिक पोशाख परिधान केले. लोक कलांचा सुंदर आविष्कार सादर केला. कार्यक्रमाचे आकर्षण भुलाबाईंचा खेळ ठरला आहे. ज्यात विद्यार्थिनींनी भुलाबाई भुलाबाई खिरापत कशाची आणलीस. असे गात खिरापतीचे पदार्थ ओळखण्याचा खेळ खेळला. हा खेळ विद्यार्थिनींना बालपणातील आनंद, संस्कृतीचे महत्त्व जाणवून देणारा ठरला. कार्यक्रमात विद्यार्थिनींनी गरबा खेळून आनंद व्यक्त केला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक उत्तम मुरकुटे व पर्यवेक्षिका सांगोळे यांचे मार्गदर्शन लाभले.

# रुग्ण, आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांना दिवाळीपूर्वी मदत

## जि.प.चे माजी सदस्य प्रकाश साबळे यांचा पाठपुरावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



आजाराचे रुग्ण आणि आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबातील सदस्यांना जिल्हा परिषदेतर्फे दिली जाणारी मदत आगामी दिवाळीपूर्वी वितरित होण्याची शक्यता आहे. जिल्हा परिषदेचे माजी सदस्य तथा शेतकरी नेते प्रकाश साबळे यांनी त्यासाठी पुढाकार घेतला असून आज, बुधवारी त्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रभारी सीईओ प्रिती देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले व समाजकल्याण अधिकारी ज्ञानबा पुंड यांची भेट घेऊन पुन्हा ही मागणी रेटली.

जिल्हा परिषद सदस्य असताना स्वतः साबळे यांनीच आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना किमान मदत दिली जावी, असा प्रस्ताव मांडला होता. सभागृहात या विषयावर एकमत झाल्यानंतर प्रतिकुटुंब ५ हजार रुपयांची मदत देण्याचा ठराव संमत करण्यात आला. याशिवाय कर्करोग, हृदयरोग, मूत्रपिंडविषयक आजार, अर्धांगवायू अशा दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांना मदत देण्याचेही धोरण जिल्हा परिषदेने ठरविले आहे. – त्यासाठी सदर रुग्णाला प्रत्येकी १५ – हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या दोन्ही आजाराबाबतची मदत ही जिल्हा परिषदेच्या स्वनिधीतून (सेस फंड) दिली जाते.प्राप्त माहितीनुसार दुर्धर आजाराने ग्रस्त रुग्णांना मदतीसाठी दीड कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अर्थात जिल्हा परिषदेतर्फे दरवर्षी एक हजार रुग्णांना अशी मदत केली जाऊ शकते. यावर्षी जिल्हा परिषदेकडे सुमारे ८०० प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. यापैकी बहुतेक प्रस्तावांची पडताळणी पूर्ण झाली असून त्यांना ती मदत देय आहे.

### सीईओ संजीता महापात्र सकारात्मक

साबळे यांनी यासंदर्भात जिल्हा परिषदेच्या सीईओ संजीता महापात्र यांच्याशीही बोलणी केली. त्या ऑक्टोबरला त्या परत येतील. मात्र सध्या सुटीवर आहेत. १३ त्यापूर्वीच त्यांनी हा विषय प्राथमिकतेचा असल्याचे कळविले निश्चितपणे दिवाळीपूर्वी मिळेल, असून, संबंधितांना त्यांची रक्कम असे कळवले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांच्या मते त्यासाठीचे सर्व सोपस्कार पूर्ण झाले असून लवकरच ही प्रक्रिया अंतिम केली जाईल. त्यानंतर संबंधितांच्या खात्यात ही मदत जमा केली जाणार आहे. अशीच स्थिती आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबीयांबाबतचीही आहे. जिल्हा परिषदेकडे सुमारे ५० ते ६० प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.

# आजपासून सुरू झाला गावोगावी काकडा आरतीचा गजर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९पथ्रोट**



'उठा पांडुरंगा प्रभात समयो पातला, वैष्णवांचा मेळा गरूडापारी दाटला वाळवंटापासूनि महाद्वारापर्यंत सुरवरांची मांदी उभे जोडोनि हात। जग जोगी जग जोगी, जाग जाग बोलती। असे अभंग, भूपाळ्या, भजन, वासुदेव, जोगी, आंधळे पांगुळे, मुका बहिरा, गवळणी, रूपक, महाआरती, पसायदानामधून गावोगावी काकडा आरतीचा गजर आजपासून सुरू होणार आहे.

वारकरी संस्कृतीचा पिढ्यानपिढ्या वारसा लाभला आहे. त्यामुळे महिनाभर चालणाऱ्या काकड आरतीला आजपासून सुरूवात झाली.ग्रामीण भागात कोजागरी पौर्णिमेनंतर काकड आरतीला सुरुवात होते.

ग्रामस्थांच्या नियोजन ज्येष्ठ पुढाकारात गावोगावची सार्वजनिक मंडळे, काकडा आरती सोहळा समिती, भजनी मंडळांसह गावांमधील ज्येष्ठ नागरिक व ग्रामस्थांच्या पुढाकाराने गावा-गावांमध्ये काकडा आरतीचे नियोजन करण्यात येते. विठ्ठल नामाचा जप आणि संताच्च्त्या अभंग, ओव्या मोठा ठेवा असून या ठेव्याचे जतन बाराही महिने वेगवेगळ्या धार्मिक उपक्रमातून जतन केले जात असते. सध्या खेडोपाडी काकडा आरती सोहळ्यात गावे दुमदुमून निघणार आहेत. त्रिपुरारी पौर्णिमेला काल्याचे कीर्तन व महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होते.

काकडा आरतीची सुरुवात पहाटे ५ वाजल्यापासून ते ७वाजेपर्यंत होते. विशेषतः काकडा आरतीला महिला मोठ्या प्रमाणावर हजेरी लावत असून गावातील तरुण मुले, वयस्कर व्यक्ती व लहान मुले पहाटेपासून आवर्जून उपस्थित राहतात.यावेळी पांडुरंगाचा अभिषेक करून पूजा केली जाते. पूजा करण्याचा मान दररोज गावातील वेगवेगळ्या लोकांना मिळतो. ज्यांचा पूजेचा मान असतो. त्यादिवशी त्यांच्या घरातील सर्व परिवार आरतीला उपस्थित राहतो.

# सरन्यायाधीश गवईंवर हल्ला प्रकरण, सोशल मीडियावर समर्थन करणाऱ्यांवर गुन्हे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१०नागपूर**

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यावर सर्वोच्च न्यायालयात सोमवारी घडलेल्या अभूतपूर्व प्रकारात एका वकिलाने वस्तू (चप्पल किंवा कागदाचा गुंडाळा) फेकण्याचा प्रयत्न केला. या घटनेनंतर न्यायालयीन कामकाज काही मिनिटे थांबले, मात्र सरन्यायाधीशांनी अत्यंत संयम राखत सुनावणी पुन्हा सुरू केली. हल्ला करणारा वकील राकेश किशोर (वय ७१) हा खजुराहोतील भग्नावस्थेतील भगवान विष्णू मंदिराच्या पुनर्स्थापनेसाठी दाखल याचिका फेटाळल्याबद्दल असंतुष्ट होता, अशी माहिती नंतर समोर आली.

या घटनेनंतर देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. वकील संघटनांनी या हल्ल्याचा तीव्र निषेध केला, तर काही समाजमाध्यम वापरकर्त्यांनी न्यायालयीन प्रतिष्ठेवरचा हल्ला म्हणून याकडे पाहिले. दुसरीकडे, काही जणांनी धार्मिक भावना उफाळून या कृतीला



समर्थन दर्शवले – सनातन धर्माचा अपमान सहन करणार नाही अशा घोषणांनी सोशल मीडियावर वातावरण तापले. आता या प्रकरणात अनेक व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**हल्ल्याचा समर्थन करण्यावर गुन्हा**

सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्या न्यायालयीन कामकाजादरम्यान एका वकिलाने चप्पल फेकण्याचा प्रयत्न केल्यानंतर, पंजाब पोलिसांनी सरन्यायाधीशांविरोधात समाजमाध्यमांवर आक्षेपार्ह आणि जातीयदृष्ट्या भडकाऊ पोस्ट करणाऱ्या व्यक्तींविरोधात एकापेक्षा अधिक गुन्हे दाखल केले आहेत. पंजाब पोलिसांच्या माहितीनुसार, राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये शंभरहून अधिक समाजमाध्यम हँडल्सविरोधात तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. या हँडल्सनी सरन्यायाधीशांविरोधात जातीद्वेष पसरवणारे आणि द्वेषयुक्त मजकूर प्रसारित केला होता. पोलिस प्रवक्त्यांनी सांगितले, या पोस्टमधील मजकूर हिंसा भडकविणारा, संविधानिक पदाविषयी आदर कमी करणारा, अनुसूचित जातीतील व्यक्तीचा अपमान करणारा, जातीय वैर वाढविणारा आणि सार्वजनिक शांततेला बाधा आणणारा असा होता.

दरम्यान, सोमवारी सर्वोच्च न्यायालयात घडलेल्या अभूतपूर्व प्रकारात, एका व्यक्तीने सरन्यायाधीश बी. आर. गवई यांच्यावर वस्तू फेकण्याचा प्रयत्न केला.त्या व्यक्तीला घोषणाबाजी करताना ऐकण्यात आले आणि तत्काळ सुरक्षारक्षकांनी त्याला न्यायालयातून बाहेर काढले. घटनेवेळी उपस्थित वकिलांच्या मते, त्या व्यक्तीने सनातन धर्म का अपमान नहीं सहेगा हिंदुस्तान अशी घोषणा केली. काही साक्षीदारांच्या म्हणण्यानुसार, त्याने चप्पल फेकण्याचा प्रयत्न केला, तर काहींच्या मते त्याने कागदाचा गुंडाळा फेकला. तो व्यक्ती वकिलाच्या पोशाखात होता. या गोंधळानंतरही सरन्यायाधीश गवई शांत राहिले आणि कामकाज सुरू ठेवले. पुढील वकिलाला बोलावताना त्यांनी म्हटले, विचलित होऊ नका, आम्ही विचलित झालो नाही. बार कौन्सिल ऑफ इंडियाने संबंधित वकिलाचे निलंबन केले आहे. दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाचे निबंधक यांनी पुढील कायदेशीर कारवाईस नकार दिल्याने दिल्ली पोलिसांनी त्या वकिलाला सोडून दिले.

# पटसंख्येचे कारण पुढे करून शाळा बंद करणे शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन, शिक्षक समितीचा आक्षेप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्यात ५ पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा तात्काळ बंद करण्याचे आयुक्त (शिक्षण) यांचे निर्देश जारी झाल्याने शिक्षण क्षेत्रात खळबळ उडाली आहे. हा निर्णय शिक्षण हक्क कायद्यातील (आरटीई) तरतुदींशी विसंगत असून, दुर्गम भागातील गोरगरीब व वंचित मुलांच्या शिक्षणावर मोठा परिणाम करणारा असल्याचे मत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने व्यक्त केले आहे. शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाच्या धोरणाला छेद देणारा हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अशी मागणी शिक्षक समितीने शालेय शिक्षणमंत्री तसेच शिक्षण विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे केली आहे.

**दुर्गम भागातील शिक्षण धोक्यात**

आयुक्त (शिक्षण) यांच्या निर्देशानुसार, ५ किंवा त्यापेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा त्वरित बंद करण्याचे पत्र शिक्षण विभागाने निर्गमित केले आहे. शिक्षक समितीच्या म्हणण्यानुसार, अशा शाळा प्रामुख्याने वाडी-वस्ती, तांडे, पाडे अशा दुर्गम भागांत कार्यरत आहेत. जंगलव्याप्त भाग, ओढे-नद्या ओलांडून जावे लागणाऱ्या या भागांत आदिवासी, कष्टकरी वंचितांच्या बालकांसाठी गावातच शिक्षणाची व्यवस्था कायम ठेवणे आवश्यक आहे. शाळा बंद झाल्यास या बालकांचे, विशेषतः मुलींचे, शिक्षण थांबणार असून, ते शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जाण्याची भीती आहे.

**वाहतूक व्यवस्थेचा उपाय अमान्य**

शाळा बंद करून विद्यार्थ्यांसाठी वाहतूक व्यवस्था करण्याचा उपाय शिक्षक समितीला अमान्य आहे. आजच्या परिस्थितीत मुलींच्या सुरक्षिततेचा विचार कुठेच होत नाही, त्यामुळे दुर्गम भागांतून वाहतुकीने दुसऱ्या गावी जाणे धोकादायक ठरू शकते, असे समितीचे म्हणणे आहे.

**शिक्षणमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्याध्यक्ष विजय कोंबे आणि राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे, शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांच्यासह शिक्षण सचिव रणजितसिंग देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग आणि अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांना यासंदर्भात निवेदन दिले आहे, अशी माहिती शिक्षक समितीचे राज्य प्रसिद्धी प्रमुख राजेश सावरकर यांनी दिली आहे.

# वन्यजीव सप्ताहात वॉर संस्थेचा उपक्रम; ५२ सापांना वाचवले, २ माकडांचे रेस्क्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

वन्यजीव सप्ताहानिमित्त वाईल्ड लाईफ अव्हेअरनेस रिसर्च अँण्ड वेलफेअर (W.A.R) संस्थेच्या वतीने विविध मानवी वस्तीत शिरलेल्या ५२ सरपटणाऱ्या प्राण्यांना जीवदान देण्यात आले. तसेच, विजेच्या धक्क्याने जखमी झालेल्या दोन माकडांचेही रेस्क्यू करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आले.जिल्ह्यातील जळका शहापूर, कापूस तळणी, सालेगाव, माहुली, सावर्डी एमआयडीसी, जेवड नगर, निंभोरा,



तपोवन आदी ठिकाणी विषारी व बिनविषारी साप, घोरपड यांसारख्या वन्यजीवांचे रेस्क्यू करण्यात आले. वन विभागाच्या मार्गदर्शनाखाली रॅपिड रेस्क्यू टीम व वॉर संस्थेचे कार्यकर्ते सक्रिय होते.वॉर संस्थेचे अध्यक्ष निलेश कंचनपुरे, ऋतिक उईके, वंश यावले, आकाश कुरळकर, दिनेश मदारी आदींनी या मोहिमेत विशेष सहभाग घेतला. मानव-वन्यजीव संघर्ष रोखण्यासाठी जनजागृतीसह प्रबोधनही करण्यात आले.वन विभाग हेल्पलाइन १९२६ किंवा वॉर संस्थेचा संपर्क क्रमांक ९७६६१६९१७४ वर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या आकस्मिक भेटीनंतर कारवाई, दुय्यम उपनिबंधक निलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**

खामला येथील सह दुय्यम उपनिबंधक वर्ग २ कार्यालयाला पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अचानक भेट देऊन पाहणी केली होती. कार्यालयातील ड्रॉवरमध्ये पाच हजार रुपये आढळून आले होते. या प्रकरणात सहाय्यक दुय्यम निबंधक अ. तु कपले यांना निलंबित करण्यात आले आहे.

दोन दिवसांपूर्वी बावनकुळे यांनी खामला येथील सह दुय्यम उपनिबंधक वर्ग २ कार्यालयाला अचानक भेट देऊन पाहणी केली होती. खामला भागातील सह दुय्यम उपनिबंधक वर्ग २ कार्यालयाबाबत आलेल्या गंभीर तक्रारीची दखल घेऊन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ही अनपेक्षित भेट होती या पाहणीत



एका अधिकाऱ्याच्या टेबलमधील ड्रॉवरमध्ये रोख रक्कम आढळून आली. याबाबत त्यांनी पोलिसांना योग्य तो तपास करण्याचे निर्देश दिले.


नागरिकांना जर कोणत्याही शासकीय कामासाठी कोणी लाच अथवा इतर कशाची मागणी केल्यास थेट तक्रार करण्याचे आवाहन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले होते. आज संबंधित अधिका-यांला निलंबित करण्यात आले. भ्रष्टाचाराविरुद्ध सरकारची शून्य-सहिष्णुतेची भूमिका आहे. कुणीही नागरिकांकडून लाच मागितल्यास, तक्रार न घाबरता करा. पारदर्शक प्रशासन हेच आमचे ध्येय आहे. राज्यात महसूल विभाग अधिक जबाबदार आणि जनतेसाठी सुलभ करण्यासाठी पुढील काही दिवसांत सर्व उपनिबंधक कार्यालयांवर विशेष तपास मोहिमा राबविण्याचे संकेत बावनकुळे त्यांनी दिले आहे

# व्यंगचित्र प्रसारित करून बच्चू कडूंचे मुख्यमंत्र्यांवर शरसंधान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

शेतकरी कर्जमाफीच्या मुद्यावर प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू हे चांगलेच आक्रमक झाले आहेत. गावोगावी सभा घेऊन ते शेतकऱ्यांना सज्ज होण्याचे आवाहन करीत आहेत. त्यातच त्यांनी समाज माध्यमांवर एक व्यंगचित्र प्रसारित करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. या व्यंगचित्राची चर्चा रंगली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय बंगल्यात तब्बल २०.४७ लाख रुपयांचा सोफा खरेदी करण्यात येणार असल्याचा आरोप




विरोधकांनी केला असतानाच आता हाच मुद्दा बच्चू कडू यांनी व्यंगचित्राच्या माध्यमातून समोर आणला आहे. एका बाजूला सोफा आणि दुसऱ्या बाजूला ओल्या दुष्काळात हतबल शेतकरी असे हे व्यंगचित्र आहे.

राज्य सरकारने कर्जमाफीचा निर्णय तातडीने घ्यावा, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी थेट मुख्यमंत्र्यांनाच इशारा दिला आहे. बच्चू कडू यांच्या नेतृत्वात येत्या २८ ऑक्टोबरला नागपूर शहरात कर्जमाफीच्या मागणीसाठी मोर्चा काढला जाणार आहे. या मोर्चात शेतकऱ्यांनी ट्रॅक्टर आणि बैलगाड्यांसह सहभागी व्हावे, सरकारने मागणी मान्य केली नाही, तर नागपूर शहर जाम करू, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपूर शहरातून बाहेर पडू दिले जाणार नाही. आम्ही नागपूरला चारही बाजूंनी घेरल्याशिवाय राहणार नाही, कर्जमुक्तीशिवाय आमचे पाय परतणार नाही, जेवढे दिवस थांबायचे, तेवढे दिवस नागपुरात थांबू, असा इशारा बच्चू कडू यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांना मदत म्हणून कर्जमाफी होत नसेल, तर हे सरकार काय कामाचे असा प्रश्न बच्चू कडू यांनी केला. सरकारने जाहीर केलेले पॅकेज ही बनवाबनवी आहे. कर्जमुक्ती, शेतमालाला हमीभावाच्या वीस टक्के बोनस, दिव्यांगांच्या प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक, मच्छीमार, मेंढपाळांना न्याय मिळवून देण्यासाठी आमचा लढा आहे. मागण्या मान्य झाल्याशिवाय आता माघार घेणार नाही, असे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे.

# तिवसा तालुक्यातील भांबोरा येथील शेतकऱ्याचे केबल चोरी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९तिवसा**

तिवसा तालुक्यातील भांबोरा येथील शेतकऱ्याचे शेतातील चोरट्यानी केबल चोरी केली.भांबोरा येथील दि.८ ऑक्टोंबर २०२५ रोजी तिवसा पोलीस स्टेशन याबाबत तक्रार करण्यात आली.भांबोरा येथील शेतकरी पवन काळमेघ यांचे शेत मौजा बंसापूर(भांबोरा) मध्ये असून त्यांच्या कडे अडीच एकर जमीन आहे.त्यांच्या शेतीमध्ये त्यांनी ह्या वर्षी कपास ची लागवड करण्यात आली होती.शेतातील पिकांना पाणी देण्यासाठी त्यांनी विहरी वर मोटार बसवण्यात आली होती.भांबोरा येथील पवन काळमेघ हे शेतकरी दि.८ ऑक्टोबर २०२५ रोजी नेहमी प्रमाणे दैनंदिन शेतात करण्यासाठी सकाळी ८ वाजता गेले होते.शेतात फवारणी करायची असल्यामुळे पाणी भरण्यासाठी शेतकरी विहरी जवळ आले असता त्यांना स्टार्टर पासून मोटारपर्यंत ११० फूट केबल गायब असल्याचे दिसले.पवन काळमेघ या शेतकऱ्यांनी आजूबाजूला पाहणी केली आणि जवळपास च्या शेतकऱ्यांना चौकशी केली असता प्रदीप गांधी यांचा २० फूट केबल,गजू निमकर ५० फूट,राजू निवल ५० फूट,प्रशांत मडघे ५० फूट,किशोर खंडार ५० फूट,रामदास निंबोरकर ५० फूट,मनोज खंडार ४० फूट ह्या शेतकऱ्यांचा केबल चोरी गेल्याचे आढळून आले.भांबोरा येथील सर्व शेतकऱ्यांनी तिवसा पोलीस स्टेशन मध्ये जाऊन तक्रार करण्यात आली.भांबोरा येथील सर्व शेतकरी मिळून केबल ची किमंत अंदाजे ४५०० रु तक्रार मध्ये नमूद करण्यात आली.भांबोरा येथील संपूर्ण शेतकऱ्यांनी तिवसा पोलीस स्टेशनला विनंती केली की केबल चोरट्याना लवकरात लवकर ताब्यात घ्यावे आणि त्याच्यावर गुन्हा नोंदवावे.

# शेकडो ग्राम रोजगार सहाय्यकांचा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रास्ता रोको

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

गेल्या तीन ऑक्टोबरपासून सुरु असलेल्या आमरण उपोषणाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने आज अमरावतीतील शेकडो ग्राम रोजगार सहाय्यकांनी आक्रमक भूमिका घेत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन सुरू केले.शेकडो रोजगार सहाय्यकांच्या या आंदोलनामुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात वाहतूक ठप्प झाली असून दोन्ही बाजूला



वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्या. अमरावती शहर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल होऊन परिस्थिती नियंत्रणात आणण्याचा प्रयत्न करत आहेत.ग्राम रोजगार सहाय्यकांची मुख्य मागणी म्हणजे शासनाच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या नियमाप्रमाणे मानधन वितरण करावे, त्यांना पूर्णवेळ कर्मचारी दर्जा द्यावा तसेच नियुक्ती व सेवानिवृत्तीचे अधिकार जिल्हा प्रशासनाकडे द्यावेत.जोपर्यंत आमच्या मागण्या पूर्ण होत नाहीत, तोपर्यंत माघार नाही, असा इशारा देत आंदोलनकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. प्रशासनाने तातडीने मागण्यांवर निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेकडून देण्यात आला आहे.

# कृषी समृद्धी योजनेत फलोत्पादनासाठी अनुदान

## अर्ज करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्यात फलोत्पादन पिकांचे क्षेत्र व उत्पादन वाढविण्यासाठी शासन शेतकऱ्यांना प्रोत्साहन देत आहे. या अनुषंगाने कृषी समृद्धी योजनेंतर्गत एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानाच्या माध्यमातून विविध घटकांसाठी अनुदान देण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियानांतर्गत फळपीक लागवडीसाठी अनुदान देण्यात येणार आहे. यात ड्रॅगन फ्रूटला २ लाख ७० हजार रुपये प्रतिहेक्टर,स्ट्रॉबेरीला ८० हजार प्रतिहेक्टर अनुदान देण्यात येणार आहे. फुलपीक लागवडीत दांड्याची फुलाला ५० हजार प्रतिहेक्टर, कंदवर्गीय फुलाला १ लाख प्रतिहेक्टर, सुटी फुलाला २० हजार रुपये प्रतिहेक्टर अनुदान देण्यात येणार आहे. मसाला पिके लागवडीत मिरचीला २० हजार रुपये प्रतिहेक्टर, आले, हळदला ८० हजार रुपये प्रतिहेक्टर, औषधी व सुगंधी वनस्पतीला ६० हजार रुपये प्रतिहेक्टर, संत्रा फळबाग पुनरुज्जीवनला २४ हजार रुपये प्रतिहेक्टर अनुदान देण्यात येते. सामूहिक शेततळेला खर्च मापदंडाच्या ७५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे.वैयक्तिक शेततळे अस्तरीकरण, अळींबी उत्पादन प्रकल्प, हरितगृह व शेडनेट गृह,प्लास्टिक मल्चिंग, पॅकहाउस व कांदाचाळ यांना खर्च मापदंडाच्या ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.संकलन एकत्रीकरण केंद्र, पूर्व-शीतकरण गृह व फिरते पूर्व-शीतकरण गृह, शीतखोली व सौरऊर्जा शीतखोली, प्राथमिक प्रक्रिया केंद्र, रायपनिंग चेंबर, एकात्मिक शितसाखळी प्रकल्पांना खर्च मापदंडाच्या ३५ टक्के अनुदान देण्यात येणार आहे. या योजनेच्या अधिक माहितीसाठी शेतकऱ्यांनी नजीकच्या कृषी विभागाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा, तसेच योजनेच्या लाभासाठी इच्छुक शेतकऱ्यांनी महाडीबिटी पोर्टलवर ऑनलादन अर्ज करावेत, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते यांनी केले आहे.

# सणासुदीच्या दिवसात जिल्ह्यात भेसळयुक्त पनीरची जोऱ्यात विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

भारतीय जेवणात पनीर हा अविभाज्य घटक मानला जातो. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा विशेष आकर्षणाचा पदार्थ असून, लग्नसोहळे, समारंभ किंवा घरी काही खास बनवायचे असल्यास पनीरच्या विविध पाककृतींचा समावेश अपरिहार्य ठरतो. मात्र, पनीरच्या वाढत्या वापरासोबतच भेसळीचे प्रमाणही चिंताजनकरीत्या वाढले आहे. अमरावती



जिल्ह्यात देखील भेसळयुक्त पनीर विक्रीचे प्रकार समोर येत असून, यामुळे ग्राहकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.अन्न व औषध प्रशासन विभागाची जिल्ह्यात कुठल्याही प्रकारची धडक कारवाई नसल्याने भेसळयुक्त पनीर विक्रेत्यांचे चांगलंच फावल आहे.

**भेसळ कशी केली जाते?**

भेसळयुक्त पनीर तयार करण्यासाठी दुधाच्या पावडरमध्ये पाणी मिसळले जाते. त्यानंतर त्यात लिंबाचा रस किंवा व्हिनेगर घालून पनीर घट्ट केले जाते. पनीर चमकदार व गुळगुळीत दिसावे म्हणून त्यात पामतेलही मिसळले जाते. अशा रीतीने तयार झालेले पनीर सर्रास बाजारात विक्रीस ठेवले जाते.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत